cmyk

## संपादकीय

### ‘नव्या भारताच्या’ स्वप्नांवर प्रश्नचिन्ह

सोमवार म्हणजे २१ जुलै पासून संसदेचे अधिवेशन सुरू झाले आहे. अपेक्षेप्रमाणे पहिल्याच दिवशी विरोधकांनी हंगामा केला आणि ऑपरेशन सिंदूर वर चर्चा घेण्याची मागणी केली. सरकारनेही यावर तयारी दर्शविली असून आता यावर सुमारे २५ तास चर्चा होणार आहे. यावर चर्चा झालीच पाहिजे यात काही दूमत नाहीच मात्र इतरही मुद्दे चर्चीले गेले पाहिजेत. केवळ एकाच विषयावर संसदेचा वेळ घालविला गेला तर इतर काही महत्वाचे विषय बाजुला राहिले जातील. देशात असे अनेक विषय आहेत, ज्या बाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यावर सर्वसमावेश धोरण ठरवावे लागणार आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


## मंत्री संजय शिरसाट यांच्या घरी रात्री हल्ल्याचा प्रयत्न

छ. संभाजीनगर-मंत्री संजय शिरसाट यांच्या घरी हल्ल्याचा प्रयत्न झाला आहे. मध्यरात्री दीडच्या सुमारास एका तरूणाकडून शिरसाट यांच्या घरी हल्ल्याचा प्रयत्न करण्यात आला. मद्यधुंद अवस्थेत हा तरूण शिरसाट यांच्या बंगल्यासमोर आला आणि त्याने शिवीगाळ करत, दगडफेक करत शिरसाट यांच्या बंगल्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी त्या तरूणाविरोधात सातारा पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला ताब्यात घेऊन पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-८७ | मंगळवार, दि.२२ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सरकार विरोधकांचा आवाज दाबतंय-राहुल गांधी

नवी दिल्ली : सरकार विरोधकांचा आवाज दाबत असल्याचा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. लोकसभाध्यक्ष विरोधकांना बोलू देत नाहीत असा आरोपही राहुल गांधींनी केला आहे.

### उद्धव ठाकरेंचा ऑगस्टमध्ये दिल्ली दौरा

मुंबई : ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात उद्धव ठाकरे दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. या दिल्ली दौऱ्यादरम्यान इंडिया आघाडीतील नेत्यांची ते भेट घेणार आहेत. उद्धव ठाकरे मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी यांची भेट घेणार असल्याची माहिती मिळत आहे.

### रेल्वे साखळी बॉम्बस्फोटातील १२ आरोपींची निर्दोष मुक्तता

मुंबई: २००६ साली झालेल्या मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची उच्च न्यायालयाकडून निर्दोष सुटका करण्यात आली आहे. मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये झालेल्या या साखळी बॉम्बस्फोटात २०९ जणांचा मृत्यू झाला होता. तर ८०० हून अधिकजण जखमी झाले होते.

### राजमाता जिजाऊंच्या वाड्याची दुरवस्था

रायगह : किल्ले रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडमधील राजमाता जिजाऊंच्या राजवाड्याची पुरती दुरवस्था झाली आहे. ज्या मातेने महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महान राजा दिला. त्याच जिजाऊ साहेबांच्या वास्तव्याचे ठिकाण असलेल्या वाड्याकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. गड किल्ल्यांप्रमाणे प्रेरणादायी या वास्तुचे जतन व्हावे अशी मागणी येथे भेट देणारे शिवप्रेमी आणि स्थानिक नागरीकांकडून केले जात आहे.

### -मुंडे खून प्रकरणात अमित शाहांची खा.सोनवणे भेट घेणार

बीड-महादेव मुंडे हत्या प्रकरणात बीडचे खासदार बजरंग सोनवणे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. बजरंग सोनवणे बीड जिल्ह्यातील इतर काही प्रकरणंही अमित शहा यांच्यासमोर मांडरणार आहेत.


# कृषीमंत्री कोकाटेंची विकेट पडणार?

## तटकरेंचे संकेत; फडणवीसांनी व्यक्त केली नाराजी

**मुंबई/धाराशिव । प्रतिनिधी**

**राज्यात दररोज असंख्य शेतकरी आत्महत्या करीत असताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे मात्र सभागृहात जंगली रम्मी खेळत होते. आता त्यांच्या या कृत्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नाराजी व्यक्त केली असून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी तुळजापुरातून कारवाईचे संकेत दिले आहेत. त्यामुळे कृषीमंत्र्यांची विकेट पडणार असल्याचे दिसत आहे.**





शेतकरी अडचणी असून कर्जमाफी मिळत नाही, शेती पिकांना भाव नाही, आत्महत्या थांबत नाहीत, अशी प्रतिकुल परिस्थिती असताना कृषीमंत्र्यांना याचे काहीच गाभिर्य नसल्याचे दिसत आहे. पावसाळी अधिवेशन असताना राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानसभेत रमी खेळण्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर त्याचे राज्यभरात पडसाद उमटले. ◀◀ पान २ वर

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

मुख्यमंत्री म्हणाले की, जे घडले ते अतिशय चुकीचे आहे. विधान भवनामध्ये अशा प्रकारची गंभीर चर्चा सुरू असताना, आपले काम नसले तरी आपण गंभीर असणे आवश्यक आहे. साधारणपणे सभागृहात कामकाजाचे कागद वाचता, किंवा इतर काही वाचता तर ते ठिक आहे. पण रमी खेळणे हे काही बरोबर नाही. कोकाटे यांनी त्यावर स्पष्टीकरण दिले आहे. त्यांनी काहीही सांगितले तरी ते काही आमच्यासाठी भूषणावह नाही.

# आ.धस, आव्हाडांना धमकी

## वाल्मिक कराडच्या समर्थकाचा व्हिडिओ व्हायरल





**बीड । प्रतिनिधी**

**मस्साजोगचा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टर माईंड असलेल्या वाल्मिक कराडचा जवळचा सहकारी असलेल्या एका व्यक्तीचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमधून आ. सुरेश धस आणि आ. जितेंद्र आव्हाड यांना धमकी देण्यात आली आहे.**

संदीप तांदळे नावाच्या वाल्मिक कराडच्या सहकाऱ्याने आपला एक व्हिडीओ शेअर करत खळबळ उडवून दिली आहे. संदीप तांदळेने आपल्या व्हिडीओमध्ये भाजपचे आमदार सुरेश धस, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड आणि बीडमधील बाळा बांगर उर्फ विजयसिंह बांगर यांना अश्लील शिवीगाळ केल्याचे पाहायला मिळत आहे. आण्णा बाहेर आल्यानंतर सर्वांनाच बघणार अशी उघड धमकी देखील या व्यक्तीने या व्हिडीओमध्ये दिली आहे. व्हिडीओमधून धमकी देणारा संदीप तांदळे हा बीडमधील सराईत गुन्हेगार असून तो वाल्मिक कराडचा समर्थक आणि जवळचा सहकारी असल्याचे म्हटले जात आहे. संदीप तांदळेने ३०७ च्या कलमांतर्गत तीन केसेस बाळा बांगर यांच्यावर दाखल केल्या होत्या. त्याच्यावर खंडणी, पोक्सो अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे देखील गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे.

## शिवेंद्रराजे म्हणाले, दादागिरी, जबरदस्ती खपवून घेणार नाही

# सत्ताधारी अन् छावामधील वाद चिघळला!

## शेतकऱ्यांसाठी मार खाऊ, छावाकडून चोख प्रत्युत्तर




**लातूर । प्रतिनिधी**

छावाच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण व इतरांनी जबर मारहाण केल्यावर त्याचे पडसाद राज्यभर उमटले. छावानेही जशास तसे उत्तर देण्याची भुमिका घेतली असून लातूर बंदची हाक दिली. त्यानंतर लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मात्र छावाला इशारा देत जबरदस्ती खपवून घेणार नसल्याचे म्हटले आहे. तर त्याला प्रत्युत्तर देताना छावाचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील म्हणाले, शेतरक्यांसाठी मार खाऊ, आम्ही कोण्या नेत्याची किंवा पक्षाची हुजरेगिरी करीत ◀◀ पान २ वर

### सुरज चव्हाणसह १३ जणांवर गुन्हा; तटकरेंच्या कार्यक्रमात गोंधळ

धाराशिव येथील तटकरेंच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी छावा आणि जनहित संघटनेने गोंधळ घातला आहे. पोलिसांनी कार्यकर्त्यांना गेट वरती आडवले होते. तर घाडगे यांना मारहाण केल्या प्रकरणी लातूरमध्ये मारहाण प्रकरणी सुरज चव्हाणसह १३ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान सोमवारी लातूर शहर बंद पाळण्यात आला असून मंगळवारी लातूर ग्रामीण बंदचे आवाहन केले आहे. तटकरे ज्या हॉटेलमध्ये थांबले होते, त्याठिकाणी छावा कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी केली.

# मुंडे कुटुंबाला न्याय न मिळाल्यास जिल्ह्यात एकाही नेत्याला फिरू देणार नाही- मनोज जरांगे

**परळी । प्रतिनिधी**

**महादेव मुंडे खून प्रकरणातील आरोपी जोपर्यंत अटक होत नाहीत तोपर्यंत बीड जिल्ह्यात कुठल्याही पक्षाच्या नेत्याला पाय ठेवू देणार नाही. तसेच बीड जिल्हाही चालू देणार नाही. मी आता एक महिन्यानंतर या प्रकरणाकडे लक्ष घालणार असून महादेव मुंडे कुटुंबीयांना न्याय मिळवून देणार असल्याचे मराठा आरक्षणाचे आंदोलन मनोज जरांगे पाटील यांनी स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे व कुटुंबीयांच्या भेटी प्रसंगी सांगितले.**

महादेव मुंडे यांच्या हत्येला १८ महिने पूर्ण झाले. पोलिसांना आरोपी माहीत आहेत. ◀◀ पान २ वर



# ज्ञानमंदिरातच गुरुजींला मद्याची झिंग

## गेवराई तालुक्यातील प्रकार: गावकऱ्यांनी नेले थेट ठाण्यात

**गेवराई/ तलवाडा । प्रतिनिधी**

**शाळेला आपण ज्ञान मंदिराचा दर्जा दिलेला आहे आणि तेथील शिक्षक हे आपले गुरु असतात परंतु जर शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक ज्ञान मंदिराला मद्यमंदिर बनवत असतील तर अशा शिक्षकांना शिक्षा झालीच पाहिजे, एक वर्षापूर्वी याच मुख्याध्यापकाची वरिष्ठाकडे तक्रार करून देखील कारवाई झाली नाही म्हणून आज चक्क गावकऱ्यांनी त्याला रंगीहात पकडून थेट पोलीस ठाण्यात नेल्याची घटना तलवाडा येथून जवळच असलेल्या श्रीपत अंतरवली जिल्हा परिषदेच्या शाळेत घडली.**

श्रीपत अंतरवली तालुका गेवराई येथील



जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या वर्तणुकीबद्दल आणि ज्ञानार्जन करत असताना दारूच्या नशेत असल्याबाबतची ◀◀ पान २ वर

# उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा राजीनामा

नवी दिल्ली-भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी राजीनामा दिला आहे. त्यांनी आरोग्याच्या कारणामुळे पद सोडले असल्याची माहिती समोर आली आहे. राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले की, प्रकृतीला प्राधान्य देण्यासाठी वैद्यकीय सल्ल्याचे पालन करत मी संविधानाच्या कलम ६७(अ) नुसार तात्काळ भारताच्या उपराष्ट्रपती पदाचा राजीनामा देत आहे.

जगदीप धनखड यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले की, मी राष्ट्रपतींचे आभार मानतो, माझ्या कार्यकाळात त्यांनी मला दिलेला ◀◀ पान २ वर







पाटोदाः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जरेवाडी ता.पाटोदा येथील पीएमश्री जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना परमेश्वर येवले यांनी स्कुल बॅग चे वाटप युवा नेते सागर धस, भवर यांच्या हस्ते वाटप केले. बीड जिल्ह्यात शैक्षणिक दर्जा उच्चवणारी जिल्हा परिषदेची शाळा म्हणुन जरेवाडी शाळेचे नाव लौकीक आहे. याच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना आज स्कुल बॅग वाटप करण्यात आला यावेळी शाळेचे मुख्यमध्यापक व शिक्षक वर्ग उपस्थिती होते.

# धारूरच्या घाटात देशी दारू सह १४ लाखाचा मुद्देमाल पकडला



**बीड-धारूर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील राजुर येथे काल एलसीबी आणि ग्रामीण पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपेत आहे की काय असे बोलले जात असताना ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५८.५० क्विंटल | २,१०० | २,९५० | २,५७४ |
| ज्वारी/हायब्रिड: १२१.५० क्विंटल | १,९५० | २,९५० | २,४३९ |
| मका/लोकल:९.५० क्विंटल | २,३०१ | २,३१५ | २,३०८ |
| तूर : ४८.०० क्विंटल | ५,७२० | ६,५६१ | ६,२७९ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३२.५० क्विंटल | २,०१० | ३,१३३ | २,५५८ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: १.०० क्विंटल | ३,९०० | ३,९०० | ३,९०० |
| हरभरा: १७.०० क्विंटल | ५,७०० | ५,९०० | ५,७६७ |

# आर्वीत जुगार अड्ड्यावर छापा; ३ लाखाचा मुद्देमाल जप्त:सहा जण अटक

**बीड-शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर कासार पोलीस स्टेशन पोलीस पथकाने आर्वी शिवारात एका शेतात लिंबाच्या झाडाखाली सुरू असलेल्या तिरट जुगारावर छापा टाकत कारवाई केली आहे.यात सहा जनास अटक करून जुगाराचे साहित्य रोख रक्कम व इतर असा ३ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पथकाने दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास आर्वी शिवारातील नमूद केलेल्या शेतात छापा मारला. या छाप्यात पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या सहा इसमांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम ४,२९०/- रुपये आणि चार मोटरसायकल असा एकूण ३,२५,१३०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी सर्व सहा आरोपींविरुद्ध शिरूर कासार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक २१३/२५ नुसार महाराष्ट्र ◀◀ पान २ वर

# ईडीने आपल्या मर्यादा ओलांडल्या सुप्रीम कोर्टाने व्यक्त केली नाराजी



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

ईडीने वकिलांना पाठवलेल्या नोटिशीवरून सर्वोच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. ईडीने आपल्या मर्यादा ओलांडल्या असून ईडीसाठी मार्गदर्शक तत्त्वे असणे गरजेचे आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

इडीने काही वकिलांना नोटिशी पाठवल्या होत्या. आर्थिक ◀◀ पान २ वर

### मी न्यूज पाहात नाही-सरन्यायाधीश

तुषार मेहता पुढे म्हणाले की, कायदेशीर सल्ला दिला असेल तर वकिलांना नोटीस जारी केली जात नाही. ईडीची बदनामी व्हावी यासाठी अनेकदा चुकीच्या गोष्टी पसरवल्या जातात. तसेच, माध्यमांत चालू असलेल्या वृत्तांचा आधार घेऊन न्यायालयाने ईडीविषयी मत तयार करू नये, अशी विनंतीही मेहता यांनी केली. यावर बोलताना हसत हसत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी मी न्यूज पाहात नाही. मी यूट्यूबवर मुलाखतीही पाहात नाही. गेल्या आठवड्यात मी फक्त काही चित्रपट पाहिले आहेत, असे मिश्किल भाष्य केले.

cmyk

## अग्रलेख

# ‘नव्या भारताच्या’ स्वप्नांवर प्रश्नचिन्ह

सोमवार म्हणजे २१ जुलै पासून संसदेचे अधिवेशन सुरू झाले आहे. अपेक्षेप्रमाणे पहिल्याच दिवशी विरोधकांनी हंगामा केला आणि ऑपरेशन सिंदूर वर चर्चा घेण्याची मागणी केली. सरकारनेही यावर तयारी दर्शविली असून आता यावर सुमारे २५ तास चर्चा होणार आहे. यावर चर्चा झालीच पाहिजे यात काही दूमत नाहीच मात्र इतरही मुद्दे चर्चीले गेले पाहिजेत. केवळ एकाच विषयावर संसदेचा वेळ घालविला गेला तर इतर काही महत्वाचे विषय बाजुला राहिले जातील. देशात असे अनेक विषय आहेत, ज्या बाबत लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यावर सर्वसमावेश धोरण ठरवावे लागणार आहे.

पहेलगाम हल्ला आणि त्यानंतरचे ऑपरेशन सिंदूर यावरील चर्चा वादळी होणार यात दुमतच नाही. त्यात अतिरेकी अद्यापही न सापडल्याने सरकार बॅकफूटवर आहे. गत अधिवेशनातील वक्फ कायद्यापासून ते मणिपूरच्या अशांततेपर्यंत आणि हिंदीच्या सक्तीपासून निवडणूक आयोगाच्या एकतर्फी कारभारापर्यंत अनेक मुद्दे चर्चेला येतील. पण, या देशातील विचारीवर्ग एका नव्याच मुद्याला घेऊन चर्चा करतो आहे. त्यावर मात्र देशातील सर्व पक्षाचे खासदार किती गांभीर्याने लक्ष देतात यावर त्यांचे आपल्या देशाच्या भविष्यावर किती लक्ष आहे ते स्पष्ट होणार आहे. हा मुद्दा आहे, यशस्वी झालेले देशातील व्यक्ती, उद्योगपती, विद्वान आणि शास्त्रज्ञ हा देश कायमचा सोडून चालले आहेत. काहींनी इथे प्रचंड संपत्ती कमावली आणि आता त्या संपत्तीसह ते कायमचे निघाले आहेत. काही स्थायिक झाले आहेत तर काहींनी आता ज्या देशात प्रगती केली तिथून अधिक प्रगत राष्ट्रात स्थिरावण्याचा प्रयत्न चालवला आहे. यापैकी कोणीही भारतात परत यायला तयार नाहीत. हा ब्रेन आणि वेल्थ ड्रेन सहजासहजी होत नाही. मोदी सरकारच्या अकरा वर्षाच्या कार्यकाळात १७ लाखाहून अधिक लोकांनी आपल्या संपत्तीसह देश सोडला आहे, अशी माहिती यापूर्वीच्या अधिवेशनात परराष्ट्र मंत्री जयशंकर यांनीच एका उत्तरात दिली होती. हा धागा पकडून पत्रकार आणि पंतप्रधान मनमोहन सिंग यांचे माध्यम सल्लागार म्हणून ख्याती प्राप्त अर्थतज्ञ व लेखक संजय बारू यांनी अलीकडेच सशेशन ऑफ द सक्सेसफुल हे पुस्तक लिहून या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. सध्या ते सर्वत्र या विषयावर मुलाखत देऊन विषय चर्चेत आणत आहेत. बारू यांचे नवे पुस्तक मोदी सरकार समोर प्रश्न उभे करत आहे. या अधिवेशनात त्यांच्या मुद्यावर गांभीर्याने चर्चा होणे अपेक्षित आहे. या पुस्तकात बारू यांनी भारतातील श्रीमंत वर्गाचे परदेशस्थलांतर, सरकारच्या धोरणांमुळे तरुणांचे परदेशात जाणे, आणि ‘नव्या भारताच्या’ स्वप्नांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. यासह, ते ‘टॅक्स टेररिझम’, ‘इज ऑफ लाइफ’ आणि ‘पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे’ स्वप्न या विषयावरही विचार करण्यास भाग पाडतात.

देशातून अब्जाधीश स्थलांतरित होत आहेत. यामागे आर्थिक अनिश्चितता, जटिल कर प्रणाली आणि परदेशातील चांगल्या संधी ही कारणे आहेत. बारू यांचा युक्तिवाद आहे की, सरकारची धोरणे या वर्गाला देश सोडण्यास प्रोत्साहन देत आहेत. उदाहरणार्थ, भारत सरकार परदेशांना कुशल मनुष्यबळ आणि बौद्धिक क्षमता पुरवत आहे. यामुळे भारतातील बौद्धिक संपत्ती कमी होत आहे, आणि ‘नव्या भारताचे’ स्वप्न धूसर होत आहे. हे करार भारतीय तरुणांना परदेशात पाठवण्यास कारणीभूत ठरत आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी होमी भाभा यांच्यासारख्या विद्वानांना भारतात परत आणून देशाला दिशा दिली होती. याउलट, आज सरकार स्वत:च तरुणांना परदेशात पाठवत आहे.

१९७० च्या दशकात रा.स्व.संघाकडे झुकाव असलेल्या अर्थतज्ञ वि. म. दांडेकर यांनी बुद्धिजीवींचे परदेशस्थलांतर कायद्याने रोखण्याची मागणी केली होती. आज संघ विचाराचे सरकारच बाहेर जाण्याचा मार्ग दाखवत आहे. मोदी देशाबाहेर भारतीयांच्या सभा गाजवत आहेत. २०१४ मध्ये भारतीय जनता पक्षाने ‘टॅक्स टेररिझम’ हा शब्द वापरून काँग्रेसवर टीका केली होती आणि कर प्रणालीत दिलासा देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु, बारू यांच्या मते, कर प्रणालीत फारसा बदल झालेला नाही. उलट, जटिल कर धोरणांमुळे मध्यमवर्ग आणि लहान उद्योजकांना त्रास सहन करावा लागत आहे. ‘इज ऑफ लाइफ’ ही घोषणा गत स्वातंत्र्यदिनी मोदी यांनी लाल किल्ल्यावरून केली. परंतु याबाबत कोणतीही ठोस प्रगती दिसत नाही. सरकारच्या धोरणांमुळे सामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारण्याऐवजी श्रीमंत वर्ग आणि परदेशी गुंतवणूकदारांना फायदा होत आहे. सरकार ‘पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे’ स्वप्न दाखवत आहे, परंतु ते मूठभर लोकांसाठी आहे. १७ लाख भारतीयांनी नागरिकत्व सोडून स्थलांतर केलेच. सरकारची धोरणे परदेशी गुंतवणूक आणि श्रीमंत वर्गाला प्राधान्य देत आहेत, तर मध्यमवर्ग, कामगार, शेतकरी आणि उद्योजक उपेक्षित राहत आहेत. भारतात राहून कल्याणासाठी कार्य करणाऱ्या वर्गांचे भले सरकार कधी करणार? विद्वान, संशोधक आणि शास्त्रज्ञांना नोकरशाहीच्या बंधनातून मुक्त करून त्यांना स्वायत्तता कधी मिळणार? सरकार ‘नव्या भारताचे’ स्वप्न दाखवत आहे, परंतु धोरणांमुळे मूठभर लोकांचाच फायदा होत आहे. मध्यमवर्ग, कामगार आणि शेतकऱ्यांसाठी ठोस योजना दिसत नाहीत. सामान्य नागरिकांचे कल्याण आणि जीवनमान सुधारण्यासाठी कोणतीही ठोस योजना दिसत नाही. खऱ्या अर्थाने ‘नवा भारत’ बनवायचा असेल, तर सर्वसमावेशक धोरणे आखावी लागतील.

ऑपरेशन सिंदूर आणि इतर मुद्दे महत्त्वाचे आहेतच. मात्र देशाच्या भवितव्याचा विचार करून विरोधी पक्ष आणि सत्ताधारी यांनी १९७० सालापासून चिंता व्यक्त केली जात असलेल्या मुद्याकडे दुर्लक्ष करू नये किंवा हा मुद्दा चर्चेचा परिघाच्या बाहेर ठेवू नये, अशी अपेक्षा आहे.

## महाजनांचा राऊतांना करारा जवाब

मुंबई। प्रतिनिधी

**खासदार संजय राऊत यांनी मंत्री गिरीश महाजन यांचा आणि लोढाचा एक फोटो शेअर करत या फोटोच्या चौकशीची मागणी केली होती. आता महाजन यांनी राऊतांना उत्तर दिले आहे. शरद पवार, अजित पवार, उध्दव ठाकरे आणि सुप्रिया सुळेंसोबत प्रफुल्ल लोढाचे फोटो असल्याचे दाखवत आता यांची सिबीआय चौकशी करणार का? असा सवाल उपस्थित केला आहे.**

राज्यात सध्या हनीट्रॅप प्रकरण चर्चेत आहे. यात आजी-माजी मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसह ७० पेक्षा जास्त जण अडकल्याचे सांगण्यात येत आहे. प्रफुल्ल लोढा हा व्यक्ती या हनी ट्रॅप मागे आहे. खासदार संजय राऊत यांनी मंत्री गिरीश महाजन यांचा आणि लोढाचा एक फोचो शेअर करत या फोटोच्या चौकशीची मागणी केली होती. त्यानंतर आमदार एकनाथ खडसे यांनी या प्रकरणाची मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. या दोघांनाही गिरीश महाजन यांनी उत्तर दिले आहे. मंत्री गिरीश महाजन यांनी म्हटले की, प्रफुल्ल लोढा अनेक पक्षात होता. शरद पवार, जयंत पाटील, अजित पवार, उद्धव ठाकरे आणि सुप्रिया सुळे यांच्या सोबत प्रफुल्ल लोढाचे फोटो आहेत. महाजन यांनी मोबाईलमध्ये हे सर्व फोटो दाखवले आहेत. आता या सर्वांची सीबीआय आणि एसआयटीकडून चौकशी करणार का? असा सवाल राऊत यांनी विचारला आहे.

# सुरज चव्हाणला अटक करून पक्षातून हकालपट्टी करा

## अन्यथा छावा स्टाईल आंदोलन करणार -अशोक रोमन

बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देऊन पत्ते भेट का दिले म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण यांनी दहा ते पंधरा गुंडांच्या मदतीने विजयकुमार घाडगे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना जबर मारहाण केली. या ध्यान हल्ल्याचा आम्ही जाहीर निषेध करत असून सुरज चव्हाण याला अटक करून त्याची पक्षातून हकालपट्टी करण्यात यावी अन्यथा छावा स्टाईलमध्ये आंदोलन करून जशास तसे उत्तर देण्यात येईल, असा इशारा छावा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी दिला आहे.**



सभागृहामध्ये रमी खेळणाऱ्या कृषी मंत्र्यांचा निषेध म्हणून छावा संघटनेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष विजयकुमार घाडगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देऊन पत्ते भेट दिले. निवेदन दिल्यानंतर घाडगे पाटील हे शासकीय विश्रामगृहात थांबले असता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते सुरज चव्हाण हे आपल्या पंधरा ते वीस गुंडासह त्या ठिकाणी आले. घाडगे पाटील व त्यांच्या दोन ते तीन सहकार्यांना चव्हाण व त्याच्या गुंडांनी जबर मारहाण केली. शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन तटकरे यांना भेटण्यास गेले होते त्यामुळे हा हल्ला शेतकऱ्यांच्या पोरावरचा आहे, याची किंमत राष्ट्रवादीला येणाऱ्या काळात भोगावे लागेल. या भ्याड हल्ल्याचा बीड जिल्हा छावा जाहीर निषेध करत असून सुरज चव्हाण यास अटक करून त्याची पक्षामधून हकालपट्टी करण्याचे काम उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी करावं, अन्यथा छावा स्टाईल आंदोलन करून जशास तसे उत्तर देण्यात येईल असा इशारा छावा जिल्हाध्यक्ष अशोक रोमन यांनी दिला आहे.

## भाजप बीड तालुका सरचिटणीसपदी हरीश खाडे

बीड । प्रतिनिधी



**भाजपचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि प्रत्येक गावामध्ये सदस्य नोंदणी करण्यासाठी अहोरात्र धडपड करणारे हरीश खाडे यांची भाजपच्या बीड तालुका सरचिटणीसपदी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी निवड केली आहे.**

मौज या गावचे रहिवासी असलेले आणि स्वर्गीय गोपीनाथ मुंडे आणि पंकजा मुंडे यांचे कट्टर समर्थक हरीश खाडे यांनी भाजपचे विचार बीड तालुक्यात प्रत्येक गावात व प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्यासाठी मोठी धडपड केली. लोकसभासह विधानसभा निवडणुकीमध्ये संघटनात्मक पक्षाची बांधणी करण्यासाठी पक्ष श्रेष्ठींनी त्यांच्यावर जबाबदारी दिली होती. आता भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी हरीश खाडे यांची बीड तालुका सरचिटणीस पदी नियुक्ती केली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून कौतुक होत असून पंकजाताई मुंडे यांनी सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय दिल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# अच्छे दिनच्या नावाखाली सरकारकडून रासायनिक खतांच्या किंमती वाढवून बळीराजांची लूट-दत्ता वाकसे

## युरिया आणि डीएपीचे दर स्थिर, पण बाजारात तुटवडा

बीड । प्रतिनिधी



अस्मानी व सुलतानी संकटांनी बळीराजा मरणासन्न अवस्थेत असल्याचे चित्र आहे. पेरणीच्या वेळी महागड्या दरात बियाणे खरेदी करणाऱ्या बळीराजाचा माल शेतातून निघाल्यानंतर कवडीमोल दरात व्यापाऱ्याच्या घशात जातो. आता सरकारकडून रासायनिक खतांच्या किमती वाढवून बळीराजाची अक्षरशः लूट सुरू केली जात आहे का? बळीराजाला देशोधडीला लावायचे आहे काय?. सरकारला असा सवाल मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे पुढे ते म्हणाले की सध्या युरिया आणि डीएपीचे दर स्थिर असताना बाजारात तुटवडा असल्याचे सांगितले जाते. मराठावाड्यात शेती निसर्गावर अवलंबून आहे. सोयाबीन, कापूस, ऊस. तूर आणि इतर पिके बहुतेक पेरणी खरीप पिकांमध्ये केली जाते. हरभरा, ज्वारी, बाजरी मूग इत्यादी रब्बी पिकांमध्ये पेरल्या जातात. पाऊस पडताच खरीप पेरणी सुरू होते. खरिपाच्या सुरुवातीला रासायनिक खतांच्या किमती वाढल्या. मिश्र खतांच्या किमतीत १२ ते १९ टक्क्यांनी वाढ करण्यात आली. युरिया आणि डीएपीची किंमत स्थिर ठेवण्यात आली होती, परंतु दोन्ही खते बाजारातून गायब झाली. ज्यांच्याकडे उपलब्ध आहेत ते शेतकऱ्यांकडून जास्त किंमत आकारत आहेत. शेतकऱ्यांना जास्त किंमत देऊन उपलब्ध असलेली खते खरेदी करावी लागत आहेत. विशेष म्हणजे शेतीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकरी आधीच त्रस्त आहेत. त्याशिवाय, रासायनिक खतांच्या किमती वाढवून, बेकायदेशीर मार्गांनी शेतकऱ्यांच्या खिशाला लुटण्यात आले आहे. हंगामात युरिया आणि डीएपीची सर्वाधिक मागणी असते. त्यांच्या किमती वाढल्या तर शेतकऱ्यांमध्ये संताप निर्माण होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांची मानसिकता ओळखून, युरिया आणि डीएपीचे दर स्थिर ठेवण्यात आले होते. परंतु ते बाजारात उपलब्ध नाहीत. इतर रासायनिक खतांच्या किमती १२ ते १९ टक्क्यांनी वाढवल्या आहेत. बाजारात उपलब्ध असलेली खते खरेदी करण्यास भाग पाडून शेतकऱ्यांचे खिसे कापण्याचा एक मार्ग शोधण्यात आला आहे. युरिया आणि डीएपीच्या कमतरतेवर सरकार आणि प्रशासन मूकदर्शकाची भूमिका बजावत आहे. एकीकडे, सरकार खतांवर अनुदान देते, तर दुसरीकडे ते ५ टक्के जीएसटी वसूल करते. पूर्वी कीटकनाशकांवर ५ टक्के जीएसटी आकारला जात होता. आता तो १८ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आल्याने शेतकऱ्यांची चांगलीच लूट सुरू आहे. असे मत मल्हार ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता वाकसे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे व्यक्त केले आहे

### सरकारचे दुटप्पी धोरण...

शेतकऱ्यांना अच्छे दिनांची स्वप्ने दाखवून त्यांचे खिसे रिकामे केले जात आहेत. सरकार शेतकऱ्यांसोबत दुटप्पी धोरण स्वीकारत आहे. शेतकऱ्यांचे कैवारी असल्याचे भासवून अनुदान देत असल्याचा गवगवा केला जातो. परंतु जीएसटी लादून शेतकऱ्यांच्या खिशातून पैसे वसूल केले जात आहेत, हे अन्यायकारक आहे.

**क्षेत्रनिहाय नुकसान व मदत खताचा प्रकार - मार्च - जून-किंमत वाढ**
**१५:१५:१५-१४७०-१६५०-१२ टक्के**
**२०:२०:०:१३-१३००-१४५०-१२ टक्के**
**१०:२६:२६-१४७०१७२५-१७ टक्के**
**२४:२४:०-१७००-१८५०-०९ टक्के**
**क्रॉप टेक - १८००-१९७५-१० टक्के**
**१२:३२:१६-१४७०-१७५०-१९ टक्के**
**युरिया - २६६ - २६६ - ०० टक्के**
**डीएपी-१३५०-१३५०-०० टक्के**

# मोफत वाळु संदर्भात तहसीलदारांशी चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल-मुख्याधिकारी विक्रम मांडुरके

गेवराई । प्रतिनिधी

**शहरातील विविध भागातील नागरिकांच्या समास्या संदर्भात गेल्या सोमवारी बाळराजे पवार यांनी जनता दरबार आयोजन केले होते त्यावेळेस शहरातील नागरिकांनी उपस्थित केलेल्या समास्याचे काय झाले यांचा आढावा घेण्यासाठी बाळराजे पवार यांनी आज सोमवार दि.२१ रोजी नगरपालिकेत बैठक आयोजित केली होती.**



यावेळी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, यांच्या सोबत मागील जनता दरबाराती विषयावर चर्चा करण्यात आली. आज झालेल्या आढावा बैठकीत उपस्थित नागरिकांनी घरकुल योजनेंतर्गत लाभार्थीना हाप्ता वितरण करण्यात यावे अशी मागणी केली,तर शहरातील अनेक भागात स्टेट लाईट बंद आसल्याचे सांगितले तर अनेक भागात कमी दाबाने पाणी येत आसल्या बाबत सागितले तसेच अनेक वॉर्डात घंटागाडी येत नसल्याच्या सुध्दा तक्रारारी यावेळी बोलतांना सागीतले आहे तर घरकुलासाठी मोफत वाळु संदर्भात मागणी केली. नागरिकांनी मांडल्या यासंदर्भात मुख्याधिकारी यांनी लक्ष घालून काही दिवसात अडचणी दुर करावेत अशा सुचना लोकनेते बाळराजे पवार यांनी बैठकी दरम्यान केली. याविषय मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यानी सर्व विभागाला तक्रारारी निवारण करा अशा सुचना देऊन पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलास मोफत वाळु संदर्भात तहसीलदारांशी चर्चा करून मार्ग काढुन वाळु उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आसल्याचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी नागरिकांना सांगितले आहे .मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, ब्रम्हदेव धुरंधरे,मा.उपनगराध्यक्ष राजेंद्र राक्षसभुवनकर, आदीसह आजी माजी नगरसेवक नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पान १ वरून...

### कृषीमंत्री कोकाटेंची

आता यावर मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया दिली आहे. माणिकराव कोकाटे यांनी त्यावर स्पष्टीकरण दिले आहे, पण त्यांनी काहीही सांगितले असले तरी ते आमच्यासाठी भूषणावह नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणावरुन नाराजी व्यक्त केली. तर दुसरीकडे तुळजापुरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे आणि छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये बैठक झाली, यावेळी कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह सुरज चव्हाणवर कारवाई करण्याचे संकेत दिले आहे. कारवाईचा चेंडू राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी अजित पवारांच्या कोर्टात टोलावल आहे. शेतकरी संकटात असताना कृषीमंत्र्यांचे वागणे अयोग्य असल्याचे तटकरेंनी म्हटले आहे. तटकरेंचे हे वक्तव्य म्हणजे माणिकराव कोकाटेंवर कारवाईचे संकेत मानले जात आहेत. आता अजित पवार माणिकराव कोकाटेंचा राजीनामा घेणार की त्यांची खुर्ची शाबूत राहणार याकडे सगळ्यांचे लक्ष असणार आहे.

--------------

### सत्ताधारी अन् छावामधील

नसल्याचे म्हटले आहे. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे हे विधानसभेत रम्मी खेळतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यानंतर त्यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी करत छावाच्या विजयकुमार घाडगे यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देत पत्ते फेकले. यावेळी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी विजयकुमार घाडगे यांना मारहाण केल्याची घटना घडली. त्याच्या निषेधार्थ छावा संघटनेच्या वतीने सोमवारी लातूर बंदची हाक दिली होती. त्यावर पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी तीव्र शब्दात छावाला सुनावले आहे. छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जबरदस्ती करू नये, दादागिरी खपवून घेणार नाही असा इशारा त्यांनी दिला. त्याला आता छावा संघटनेकडून प्रत्युत्तर देण्यात आले आहे. आम्ही कोणत्या नेत्याची किंवा पक्षाची हुजरेगिरी करत नाही, शेतकऱ्यांच्या हितासाठी गुंडगिरी करणार, मार खावा लागला तरी खाणार असे छावाचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिलेल्या आदर्शानुसार आम्ही काम करतो, शेतकऱ्यांसाठी जबरदस्ती करावी लागली तर करणार असे छावा संघटनेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**सूरज चव्हाणांला राजीनामा देण्याचा अजितदांचा आदेश**

घाडगे पाटील यांना मारहाण करणे सुरज चव्हाणला चांगलेच अंगलट आले असून अजित पवार यांनी सुरज चव्हाण यांना राजीनामा देण्याचे आदेश दिले आहेत.

------------

### मुंडे कुटुंबाला न्याय न मिळाल्यास

तरीदेखील ते पकडले गेले नाहीत. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी बीड पोलीस अधीक्षक कार्यालयात विष प्राशन करून जीवन संपवण्याचा प्रयत्न केला होता. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी माझ्या पतीला न्याय मिळवून द्यावा अशी विनंती ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केली होती. महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेण्यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील दिनांक २१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ५.३० वाजता परळी येथे आले होते. यावेळी त्यांनी ज्ञानेश्वरीताई मुंडे व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांची भेट घेतली. यावेळी महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मोठा भाऊ म्हणून ज्ञानेश्वरी ताईंच्या पाठीशी उभा राहणार असून मुंडे कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी एक इंच ही मागे हटणार नाही. जोपर्यंत आरोपी अटक होत नाहीत तोपर्यंत बीड जिल्ह्यात एकाही नेत्याला पाय ठेवू देणार नाही व बीड जिल्हा बंद करू, प्रसंगी राज्य ही बंद करू असा इशाराही त्यांनी यावेळी सरकारला दिला. या प्रसंगी विविध पक्षातील कार्यकर्ते तसेच मराठा समाजातील अनेक मान्यवर नेत्यांची कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

-------------

### ज्ञानमंदिरातच गुरुजींला

तक्रार तत्कालीन गटशिक्षणाधिकारी सोनवणे यांच्यासह शिक्षणाधिकाऱ्याकडे गावकऱ्यांनी केली होती मात्र त्याची अद्याप पर्यंत दखल न घेतल्याने या शाळेचे कुलकर्णी नामक मुख्याध्यापक चक्क शाळेमध्येच मद्यप्राशन करत आहेत विशेषता विद्यार्थ्यांना ज्ञानरजनाचे काम करण्याऐवजी हे स्वतःच मध्याच्या झिंग मध्ये असल्याने हे विद्यार्थ्यांना काय शिकवणार असा प्रश्न पालकांना पडला होता तेव्हा आज गावचे सरपंच व काही पालकांनी संबंधित मुख्याध्यापकाला थेट मध्य घेतानाच रंगेहात पकडले तेही शाळेतच याबरोबरच शाळेतच अध्यापन करत असल्याचे फोटो आणि उपयोग देखील गावकऱ्यांनी व्हायरल केले प्रामुख्याने १० /७/२०२४ ला तक्रार करू देखील कारवाई झालेली नाही त्यामुळे आज गावकऱ्यांनी रंगेहात पकडून थेट वैद्यकीय तपासणीसाठी तलवाडा पोलीस ठाण्यामध्ये आणल्याचे समजते संबंधित मुख्याध्यापक हे याच शाळेवर गेल्या चार वर्षापासून कार्यरत आहेत अनेक वेळा समज देऊनही काहीच फरक पडत नसल्याचे महादेव आर्दड, रामेश्वर आर्दड, चंद्रकांत पटेकर, विलास जाधव दत्ता बनसोडे, रोहित बनसोडे आकाश पटेकर यांच्यासह गावकऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान मागील काही महिन्यांमध्ये बीड तालुक्यातील तळेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवर दोन शिक्षक दारूच्या नशेत असतात त्यांची तक्रार शिक्षण विभागाकडे करण्यात आली होती या प्रकरणात चौकशी होऊन दोन्ही शिक्षक दोषी आढळल्यानंतर या दोघाच शिक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती आता तलवाडा पासून जवळ असलेल्या श्रीपत अंतर्वली येथील या मुख्याध्यापकावर काय कारवाई केली जाते याकडे शिक्षण समिती आणि पालकांचे लक्ष लागून आहे

**अशा कर्मचाऱ्यावर कारवाई होईल शिक्षण अधिकारी**

जिल्हा परिषदेच्या शाळेवर एखादा शिक्षक किंवा कर्मचारी माध्यमातून आलेला असेल किंवा करत असेल ही बाब अत्यंत गंभीर असून पालकांना असे आढळून आल्यास त्यांनी तात्काळ त्याला पोलीस ठाण्यामध्ये घेऊन जावे त्याची वैद्यकीय तपासणी झाली की कारवाई होते मात्र आता या प्रकरणात आपण स्वतः चौकशी लावून कारवाई करू असे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दैनिक लोकतंत्र शी बोलताना सांगितले

------------

### धारूरच्या घाटात देशी

धारूर घाटात आज राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत देशी दारू सह चौदा लाख तीस हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. दैनिक राज्य लोकतंत्रणे काल राज्य उत्पादन शुल्क विभाग झोपेत पोलिसांनी राजुर येथील दारू खड्ड्यावर केली कारवाई या मथळ्याखाली बातमी प्रकाशित केल्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाने रविवारी रात्री दहा वाजता धारूर घाटामध्ये एका महिंद्रा कंपनीच्या १ एम एच ४६ पी ४३ १८ या संस्थेत वाहनाचा पाठलाग करत की अडवली असता आरोपी श्रीराम रंगराव जाधव राहणार शिवाजीनगर माजलगाव पवन सुरेश मुळे राहणार श्रीरंगवाडी तालुका माजलगाव या दोघांना ताब्यात घेऊन वाहनाची तपासणी केली असता या वाहनांमध्ये जवळपास ५० बनावट देशी दारूचे बॉक्स आढळून आले या देशी दारू च्या किमतीसह १४ लाख तीस हजार रुपयांचा मुद्देमाल यावेळी जप्त करण्यात आला ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक विश्वजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक जगदीश पोरे आर बी कदम पोलीस जवान जारवाल एस व्ही धस एपी कदम एस एस चाटे डी वाय वाय बट यांनी केली असून पुढील तपास जगदीश कोरे हे करत आहेत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने जनतेला आव्हान करण्यात येते की आपल्या परिसरामध्ये बनावट मध्याची विक्री होत असल्यास याबाबतची माहिती संबंधित विभागाला द्यावी असे आवाहन उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक विश्वजीत देशमुख व निरीक्षक जगदीश कोरे यांनी केले आहे

---------

### उपराष्ट्रपती जगदीप धनखड

पाठिंबा आणि त्यांनी केलेले सहकार्य अभूतपूर्व होते. मी पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाचेही मनापासून आभार मानतो. पंतप्रधानांनी दिलेला पाठिंबा अमूल्य होता, माझ्या कार्यकाळात मी खूप काही शिकलो आहे.

---------------

### ईडीने आपल्या मर्यादा ओलांडल्या

गैरव्यवहाराचे आरोप असलेल्या आरोपींना वकिलांनी सल्ला दिला म्हणून या नोटिशी पाठवण्यात आल्या होत्या. या नोटिशींविरोधात संबंधित वकिलांनी थेट सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. ईडी तसेच इतर केंद्रीय संस्थांच्या माध्यमातून सत्ताधारी पक्षातील लोक विरोधकांवर सूड उगवतात असा दावा नेहमीच केला जातो. आता याच ईडीवर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाची टिप्पणी केली आहे. एका प्रकरणावर सुनावणी घेताना ईडी आपल्या सर्व मर्यादा ओलांडत आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच ईडीला मार्गदर्शक सुचनांची गरज असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. सरन्यायाधीश भूषण गवई, न्यायमूर्ती विनोद चंद्रन यांच्या द्विसदस्यीय खंडपीठाने या प्रकरणाची स्वत: दखल घेत सुनावणी घेतली होती.

------------

### आर्वीत जुगार अड्ड्यावर छापा; ३

जुगार अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी अवैध धंद्यांविरोधात आपली मोहीम यापुढेही सुरू ठेवणार असल्याचे स्पष्ट केले आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, पोलीस हवालदार क्रमांक १५३० तुषार गायकवाड, पोलीस शिपाई क्रमांक २२२१ सतीश बहिरवाल आणि पोलीस शिपाई क्रमांक २२२९ सुनील बहिरवाल यांनी केली आहे.

**पकडण्यात आलेले आरोपी**

१) दिलीप लिंबाजी गाडे, वय- ३५ वर्ष,रा. तरडगव्हाण,ता- शिरूर कासार, २) बाबासाहेब भाऊराव कदम, रा.आर्वी,ता- शिरूर कासार, ३) गणेश बापूराव कासोळे,वय ३५ वर्षे, रा. भालगाव, ता. पाथर्डी, ४) विठ्ठल पांडुरंग बांगर वय ५५ वर्षे, रा. सावरगाव, ता. शिरूर कासार ५) अंबादास रावसाहेब खेडकर, वय ३७ वर्षे, रा. भालगाव,ता. पाथर्डी ६) सोमनाथ बबनराव मोहिते, वय ३८ वर्ष, रा. आर्वी,ता. शिरूर कासार, जि. बीड.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २२ जुलै २०२५




## थोडक्यात...


### पाटोद्यात स्वामी समर्थ मंदिराचा पायाभरणी शुभारंभ

पाटोदा । प्रतिनिधी


पाटोदा शहरामध्ये गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या मंदिर बांधकामासाठी सुरुवात झाली. आमदार सुरेश धस यांच्या प्रयत्नातून या मंदिराचा शुभारंभ होत असून सुरेश आण्णांनी नगर विकास खात्यातून मंजुरी मिळून २५ लाख रुपये निधी श्री स्वामी समर्थ मंदिराच्या पायाभरणीच्या शुभारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला स्वामी समर्थ मंदिरासाठी स्वामी समर्थ सेवा कर यांनी कित्येक दिवसापासून मागणी सुरेश आण्णाकडे लावून धरली होती अण्णांनी त्यांची मागणी पूर्ण केली असून स्वामीभक्तामध्ये उत्सवाचे वातावरण आहे रविवारी मंदिर बांधकामाला सुरुवात झाली असून पर दिनांक १९ जुलै रोजी कामाचा शुभारंभ करण्यात आला या मंदिरासाठी जागा देशमुख कुटुंब यांनी मंदिरासाठी जागा दान केली पन्नास बाय ४० फुटाची जागा मंदिरासाठी देण्यात आली. आमदार सुरेश यांनी नगर विकास खात्याकडून मंजुरी मिळून २५ लाख रुपयांचा निधी मिळवून दिला . भरणे शुभारंभासाठी उपस्थित स्वामी सेवेकरी भाविक भक्तगण उपस्थित होते.

### शालिनी सुलाखे यांचे दुःखद निधन

बीड । प्रतिनिधी



चकलंबा येथील स्व धर्मराज सुलाखे यांच्या पत्नी श्रीमती शालिनी सुलाखे वय ७८ वर्ष यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. चकलांबा तालुका गेवराई येथील श्रीमती शालिनी धर्मराज सुलाखे (वय ७८) यांचे वृद्धापकाळमुळे २० जुलै रविवार रोजी दुःखद निधन झाले आहे.त्या अत्यंत मनमिळाऊ आणि धार्मिक स्वभावाच्या होत्या,रविवारी सायंकाळी चकलांबा येथे ५ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात ४ मुले,सुना,नातवंडे,पतवंडे असा परिवार आहे,विस्तार अधिकारी अरविंद,शिक्षक धनंजय,शिक्षक उदय,आणि चकलंबा येथील डॉ.विजय सुलाखे यांच्या त्या मातोश्री होत,अंत्यविधीसाठी गावातील ग्रामस्थासह छत्रपती संभाजीनगर,पैठण,गेवराई, बीड येथील नागरिक उपस्थित होते



### मुलींसाठी एकदिवसीय व्हिडीओ एडिटिंग कार्यशाळा उत्साहात पार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

खास मुलींकरिता आयोजित केलेल्या ''वन डे व्हिडीओ एडिटिंग वर्कशॉप'' ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यशाळेचे आयोजन इमेज फोटो फिल्म्स आणि प्रेमराज साळवे यांनी केले होते.या वेळी विशेष मार्गदर्शनासाठी दीपक लोकारे यांची उपस्थिती लाभली होती. तसेच सौंदर्य क्षेत्रातील अनुभवी आणि वरिष्ठ मेकअप आर्टिस्ट दळवी मॅडम यांच्यासह प्रियांका मॅडम, मॅडम, आसमा मॅडम, अंजुम मॅडम आणि प्रिया मॅडम यांनीही उपस्थित राहून मुलींना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास सध्याच्या सरपंचांच्या मातोश्री पाटील मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभली.या कार्यशाळेमुळे अनेक तरुणींना मोबाईलवर फोटो व व्हिडीओ एडिटिंगची तांत्रिक माहिती मिळाली असून, त्यांनी स्वतःच्या व्यवसायासाठी त्याचा उपयोग करण्याचा निर्धार व्यक्त केला.कार्यक्रमाचे संयोजन उत्कृष्टरीत्या पार पडले असून, परिसरातील मुलींना डिजिटल सशक्तीकरणाकडे एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## मांजामुळे कड्यात एक जखमी

कडा । प्रतिनिधी

मांजा धाग्यावर बंदी असताना याठिकाणी सर्रास विक्री चालू असून या धाग्यामुळे एका मुलीचा जीव धोक्यात आला. दुचाकीवरून जाणाऱ्या तरुणीला नायलॉन मांजामुळे गंभीर दुखापत झाली. मांजाला बंदी असतानाही याची सर्रास खरेदी-विक्री चालू आहे. याकडे सातत्याने दुर्लक्ष होताना दिसत आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियमानुसार यात दंड आणि शिक्षेची तरतूद आहे. तरीही ही विक्री बंद होताना दिसत नाही. या मांजामुळे अनेक पक्ष्यांना आणि नागरिकांनाही गंभीर दुखापत झालेली आहे. मात्र याची दखल घेण्यात आलेली नाही.

# सहकार, शिक्षण क्षेत्रात मंगलाताई सोळंके यांचे कार्य नोंद घेण्यासारखे

## प्रसिद्ध उद्योजिका सौ.राजश्रीताई हेमंत पाटील यांचे गौरवोद्गार, मंगलाताई सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला अलोट गर्दी

माजलगाव । प्रतिनिधी

आज महिला कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत, त्याला सहकार क्षेत्रही कसे अपवाद असेल. माजलगाव विधानसभा मतदारसंघात सौ.मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांचे सहकार क्षेत्रात मोठे योगदान आहे. राजकीय आणि सामाजिक पटलावर मंगलाताई यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली, असे गौरवोद्गार नांदेडच्या गोदावरी उद्योग समुहाच्या सर्वेसर्वा सौ.राजश्रीताई हेमंत पाटील यांनी माजलगाव येथे काढले. त्या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.



या अभिष्टचिंतन सोहळयाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते डॉ.प्रकाशराव आनंदगावकर होते तर मंचावर आमदार प्रकाशदादा सोळंके, माजी आमदार मोहनराव सोळंके, राधाकृष्ण होके पाटील, उद्योजक डॉ.आर.जी.बजाज, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, वडवणीचे नगराध्यक्ष शेषेराव जगताप, माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या सचिव नीलाताई देशमुख, लोकनेते सुंदरराव सोळंके साखर कारखान्याचे अध्यक्ष विरेंद्र सोळंके, उपाध्यक्ष तथा जिल्हा परिषदेचे माजी सभापती जयसिंह सोळंके, तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ, श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचे सीईओ रविंद्र कानडे,आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना सौ.राजश्रीताई पाटील म्हणाल्या, ''महिलांनी केवळ साक्षर होणे पुरेसे नाही, तर त्यांनी आर्थिक साक्षर व्हावे, यासाठी विविध संस्थांनी पुढाकार घेणे काळाची गरज आहे. महिला या विकासाच्या प्रक्रियेतील महत्त्वाच्या घटक आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मराठवाड्यात मंगलाताई सोळंके यांनी सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रात उभे केलेले काम अतिशय नोंद घेण्यासारखे आहे.'' असे स्पष्ट व प्रेरणादायी विचार सौ.राजश्रीताई पाटील यांनी व्यक्त केले. या अभिष्टचिंतन सोहळ्याला संपूर्ण माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सौ.मंगलाताई सोळंके यांना शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपत या सोहळ्याचा एक भाग म्हणून रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्याला उदंड प्रतिसाद मिळाला. सौ.मंगलाताई सोळंके यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात बाबा देशमाने, भगीरथ तोडकरी संपादित विशेषांकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.प्रकाशराव आनंदगावकर यांनी अध्यक्षीय समारोपात सौ.मंगलाताई सोळंके यांचे कौतुक करत सोळंके घराण्याचा दैदिप्यमान वारसा विशद केला. कार्यक्रमाला शेकडो महिला आणि पुरूषांची लक्षणीय संख्या उपस्थित होती.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुहास सोळंके,शेख अनवर,राहुल कदम,महादू वाघ, विनोद कुमार, डॉ.के.अनंत बाबू, भगवान शेजुळ, इरफान पठाण, प्रदीप बुरकुल,देवेंद्र सोळंके,दत्तात्रय सोळंके,अमर होरमाळे यांनी परिश्रम घेतले. या सोहळ्याचे सूत्रसंचालन सखाराम जोशी, वरूणराज तौर यांनी तर आभार विरेंद्र सोळंके यांनी मानले.

### माझ्या संघर्षाचे काळात मंगला यांची समर्थ साथ लाभली : आ.सोळंके

या अभिष्टचिंतन सोहळ्यात बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, माझ्या सामाजिक आणि राजकीय जीवनात सौ.मंगला यांचे अमूल्य योगदान आहे. जीवनातील संघर्षाच्या काळात त्यांनी दिलेली खंबीर साथ विसरणे शक्य नाही. आज त्यांचा ७० वा वाढदिवस आणि अभिष्टचिंतन सोहळा होत आहे. त्यांचा शंभरावा वाढदिवस साजरा करण्याचे भाग्य मला लाभावे,अशा सदिच्छा आमदार सोळंके यांनी व्यक्त केल्या.

### अभिष्टचिंतन सोहळा जीवनातील अविस्मरणीय क्षण : सौ.मंगलाताई सोळंके

सत्काराला उत्तर देताना सौ.मंगलाताई सोळंके म्हणाल्या, महिला सक्षमीकरण काळाची गरज आहे. याबाबत प्रत्येक महिलेने जागरूक होणे गरजेचे आहे. महिलांनी आपापल्या क्षेत्रात प्रगती करावी. माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून महिलांना सक्षमीकरणासाठी बळ देण्याचे भाग्य मला लाभले. माजलगावकरांच्या जिव्हाळ्यातून उतराई होणे शक्य नाही, माझ्यासाठी हा अभिष्टचिंतन सोहळा जीवनातील एक अविस्मरणीय क्षण आहे, असे भावपूर्ण उद्गार सौ.मंगलाताई सोळंके यांनी काढले.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहराध्यक्षपदी महादेव आदमाने यांची नियुक्ती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सामाजिक कार्यकर्ते माजी सभापती महादेव आदमाने यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री धनंजय मुंडे, महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपालीताई चाकणकर, युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार संजय दौंड,माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बबनभैया लोमटे यांच्या उपस्थिती मध्ये महादेव आदमाने यांना त्यांच्या निवडीचे नियुक्तिपत्र देण्यात आले. महादेव आदमाने यांच्या निवडीमुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व शुभेच्छा दिल्या जात आहेत.



महादेव आदमाने यांनी केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीनुसार तसेच आमदार धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महादेव आदमाने यांना अंबाजोगाई शहराच्या अध्यक्ष पदाची जवाबदारी सोपवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोचविण्यासाठी आदमाने हे प्रयत्न करतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या अत्यंत जवळचे शांत, संयमी, सतत हसतमुख, सामाजिक कार्यात तन-मन-धनाने अहोरात्र अग्रेसर असणारे वेळ प्रसंगी कठोर भूमिका घेणारे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते महादेव आदमाने यांच्यावर शहराध्यक्ष पदाची जवाबदारी टाकली आहे.

## स्वामी विवेकानंद शाळेतील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांची बँकेला शैक्षणिक क्षेत्रभेट

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई येथे इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांसाठी दीनदयाळ बँक येथे एक माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी शैक्षणिक क्षेत्रभेट दिनांक १८/०७/२०२५ वार शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आली होती. या क्षेत्रभेटीमध्ये बँकेचे मॅनेजर आदरणीय श्री सुनील देशपांडे सर यांनी विद्यार्थ्यांना सहज आणि समजण्याजोग्या भाषेत बँकेच्या कार्यप्रणालीचे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांमध्ये भविष्याविषयी प्रेरणा निर्माण करत, ''चांगलं शिक्षण घेतल्यास बँकेत नोकरी मिळू शकते'' हे समजावून सांगितले. श्रीमती छाया राठोड मॅडम (क्लर्क, दीनदयाळ बँक) यांनी विद्यार्थ्यांना मशीन, क्लिप भरणे, रोख व्यवहार, बचतीचे महत्त्व याबाबत अतिशय साध्या व प्रभावी पद्धतीने माहिती दिली. मुलांनी प्रत्यक्ष बँकेचा परिसर पाहिला, विविध काउंटर, कॅश सेक्शन व एटीएम यंत्रणा प्रत्यक्ष अनुभवली.ही क्षेत्रभेट अधिक उत्कृष्ट होण्यासाठी नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष आदरणीय श्री संतोष दादा कुलकर्णी व स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर शाळेच्या सचिव तथा मुख्याध्यापिका आदरणीय स्वरूपाताई दिग्रसकर यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले. या उपक्रमासाठी इयत्ता दुसरीतील सर्व अध्यापकांनी विशेष मेहनत घेतली.विद्यार्थ्यांचा सहभाग, उत्सुकता व अनुभवामुळे ही क्षेत्रभेट खरोखरच शैक्षणिकदृष्ट्या समृद्ध करणारी ठरली.

## पान ६ वरून...

### जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई, कम्युनिस्ट पक्षाचे नेते अजय बुरांडे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ॲड प्रकाश मुंडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, काँग्रेसचे नेते वसंतराव मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, शिवसेनेचे तालुका प्रमुख भोजराज पालीवाल, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका अध्यक्ष श्रीकांत पाथरकर, जेष्ठ नेते उत्तम माने, संभाजी ब्रिगेडचे सेवकराम जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे देवराव लुगडे महाराज, सामाजिक कार्यकर्ते व साहित्यिक रानबा गायकवाड, कॉ पांडुरंग राठोड, पत्रकार भगवान साकसमुद्रे, विद्यार्थी आघाडीचे सय्यद उमेर आदिंनी या विधेयकाच्या विरोधात आपले विचार मांडले. राज्य सरकारने आणलेला जनसुरक्षा हा कायदा सर्वसामान्य नागरिकांना भारतीय राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकार आणि व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणार असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले. यावेळी शिक्षक नेते पी.एस.घाडगे, जगन्नाथ सोळंके, विठ्ठलराव झिलमेवाड, भगवान बडे, दता दहिवाळ, धम्मानंद क्षीरसागर, गौतम साळवे, ज्ञानेश्वर मुंडे, बालासाहेब गिते, प्रकाश वाघमारे, सय्यद जाबेर, अहेमद सय्यद, सय्यद फेरोज, यशवंत सोनवणे, दिपक सिरसाठ, मदन वाघमारे, शंकर शेजुळ, जावेद शेख, रंजना खरात, सुभाष सावंत, बाबासाहेब रोडे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते , सामाजिक कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परळीच्या प्रभारी

निलंबनानंतर आष्टी येथे देण्यात आले होते. आष्टी येथे असताना गायब राहणे, कार्य विवरण तक्त्याप्रमाणे कामे केली नाहीत. कनाके यांचे नियंत्रण नसल्याने १० शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यावर कारवाई करण्यात आली होती. प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचा कार्यभार असताना कनाके यांच्याविषयी अनेक गंभीर तक्रारी होत्या. यामुळे गेवराई येथे कार्यरत असलेले शिक्षण विस्तार अधिकारी भिमराव नांदुरकर यांची परळी पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. नांदुरकर यांनी यापूर्वी बीड, वडवणी, माजलगाव आदी ठिकाणी यापूर्वी प्रभारी गट शिक्षणा धिकारी म्हणून काम पाहिले आहे.

### सभागृहात रम्मी खेळणाऱ्या

या अगोदरही त्यांनी अशाच प्रकारे शेतकरी विरोधी वर्तन केलेले आहे. त्यामुळे त्यांनी त्यांच्या पदाचा स्वतःहून राजीनामा द्यावा त्यांनी राजीनामा न दिल्यास त्यांच्या पक्षप्रमुखांनी त्यांचा राजीनामा घ्यावा म्हणजे पुढील काळात होणारा शेतकऱ्यांचा अपमान थांबेल.अशी मागणी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव शिवाजी कुरे यांनी केली आहे.

### माजलगाव शहर भाजपाच्या

वाढते आणि शरीर अधिक उत्साही वाटते,रक्तदान करताना काही प्रमाणात कॅलरी बर्न होतात त्यामुळे वजन कमी करण्यास देखील मदत होते आपल्या शरीरात होतात., आणि त्यामुळे आपण सर्वांनी रक्तदान नक्की करावे, व आपण रक्तदान केल्यामुळे एखाद्याचा जीव वाचू शकतो त्यामुळेच म्हणतात रक्तदान हे श्रेष्ठ दान, जीवनदान आहे व त्यामुळे हे रक्तदान शिबिर या वाढदिवसानिमित्त आयोजित केले आहे या रक्तदान शिबिरात सर्वांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे व रक्तदान करावे अशा प्रकारचे आवाहन माजलगाव शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

### पंकजा मुंडे यांच्या

पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजक गणेश लांडे यांनी राबविलेल्या या सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न केला. श्री क्षेत्र नारायणगड परिसर आज समाजसेवेच्या विविध उपक्रमांमुळे प्रेरणास्थान ठरत आहे.

## फार्मसी क्षेत्रात 'नवा मैलाचा दगड' विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध

माजलगाव । प्रतिनिधी

फार्मसी क्षेत्रात नवनवीन शैक्षणिक उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांना दिशा देणारे गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे,विभाग प्रमुख प्रा.डॉ. निखिल जाधव यांनी एम.फार्मसी विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ''मॉडर्न ऍनालॅटिकल टेक्निक्स'' असे नवीन पुस्तक प्रकाशित केले आहे.या पुस्तकाचे प्रथमदर्शी लोकार्पण गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष व प्रख्यात हृदयविकार तज्ञ डॉ. यशवंत राजेभोसले यांच्या हस्ते संपन्न झाले.



औषधनिर्माणशास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम. फार्मसी) विषयांमधील फार्मास्युटिकल ॲनालिसिस हा विषय सर्व डिपार्टमेंट साठी कॉमन आहे त्याच बरोबर यात सिलॅबसवर आधारित भारतीय लेखकांचे फारच तुरळक व समजण्यास कठीण पुस्तके आहेत त्याचबरोबर यांतील संकल्पना गुंतागुंतीची आणि भाषा अवघड असल्यामुळे विद्यार्थी या विषयाकडे दुर्लक्ष करतात असे जाधव यांच्या लक्षात आले.त्यामुळे त्यांनी हे पुस्तक फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडियाने निर्देशित केलेल्या बी. फार्मसी अंतिम आणि एम.फार्मसी प्रथमवर्ष अभ्यासक्रमातील फार्मास्युटिकल ॲनालिसिस विषयाशी निगडीत बनवले आहे.हे पुस्तक विद्यार्थ्यांसाठी सुलभ भाषेत आणि अभ्यासक्रमावर आधारित मार्गदर्शन करणारे असून त्यात सविस्तर आकृत्या व माहितीपूर्ण तक्ते दिलेले आहेत. विद्यार्थ्यांच्या मनातील ॲनालिसिस विषयाची भीती निघून जावी तसेच विद्यार्थी परीक्षेसह संशोधन आणि औद्योगिक क्षेत्रातही आत्मविश्वासाने पुढे जावेत, हा या पुस्तकामागील मुख्य उद्देश असल्याचे डॉ. निखिल जाधव यांनी सांगितले.पुस्तकाच्या प्रकाशनावेळी बोलताना डॉ. यशवंत राजेभोसले म्हणाले, ''एम.फार्म विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण मार्गदर्शन देणारे हे पुस्तक निश्चितच शैक्षणिक क्षेत्रात मोलाची भर घालेल.'' या कार्यक्रमास गुरुकृपा इन्स्टिट्युट ऑफ फार्मसीचे प्राचार्य अमित बिंदू, गुरुकृपा कॉलेज ऑफ फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ.मुकेश बाबू उपस्थिती लाभली.या यशाबद्दल सर्व स्टाफने जाधव सरांचे अभिनंदन केले.

## नगरसेवक संतोष जाधव यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा अजित पवार गटात जाहीर प्रवेश

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात मोठा राजकीय भूकंप घडवणारी घटना आज समोर आली.पाटोदा नगरपंचायतचे लोकप्रिय नगरसेवक संतोष दादा जाधव यांनी आपले अनेक समर्थकांसह अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात थेट प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशामुळे संपूर्ण पाटोदा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.हा ऐतिहासिक पक्षप्रवेश बीड येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी जाधव यांच्यासोबत शेकडो कार्यकर्ते, पदाधिकारी, युवापिढी यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या झेंड्याखाली येत पक्षाची ताकद भक्कम केली.संतोष जाधव हे पाटोद्यातील जनतेशी नाळ जुळवून काम करणारे खंबीर नेतृत्व म्हणून



ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक सामाजिक कार्य, विकासकामे आणि जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने आवाज उठवला आहे. त्यामुळेच त्यांचा पक्षप्रवेश हा फक्त एक राजकीय घटना नसून भविष्यातील समीकरणे बदलणारा निर्णय मानला जात आहे.या प्रवेशानंतर बोलताना संतोष जाधव म्हणाले, ''मी हे पाऊल घेतले आहे ते विकासाच्या राजकारणासाठी.अजित पवार साहेबांची काम करण्याची शैली, जनतेशी असलेली बांधिलकी आणि सुनील तटकरे यांचे मार्गदर्शन यामुळेच मी राष्ट्रवादी काँग्रेसला माझे राजकीय घर मानले आहे.''या ऐतिहासिक घडामोडीमुळे पाटोद्यात राजकीय समीकरणे झपाट्याने बदलणार आहेत, तर आगामी स्थानिक निवडणुकांमध्ये याचा मोठा प्रभाव जाणवणार हे निश्चित आहे.

## स्वामी विवेकानंद विद्यामंदिरमध्ये गुणवंतांचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षातील विविध स्पर्धा परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे सचिव जी. बी. गदळे, प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, ज्येष्ठ शिक्षक अजय देशपांडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेतील सहशिक्षक तसेच एम.टी.एस. ऑलंपियाड समन्वयक बी. एम. टिंगरे यांनी केले. याप्रसंगी ते म्हणाले, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेचा आलेख केवळ गुणात्मक नव्हे तर संख्यात्मक ही वाढत आहे. यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये एकूण तीन विद्यार्थी दुसऱ्या लेव्हल साठी पात्र ठरले आहेत. महाराष्ट्र टॅलेंट सर्च राज्यस्तरीय परीक्षेमध्ये शाळेतील मुंडे आर्यन अंगद इयत्ता सातवी मधून राज्यातून सर्वप्रथम आला आहे. तर एम. टी. एस. ऑलंपियाड परीक्षेमध्ये इयत्ता आठवीतून यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय आली आहे. स्पेशल मोमेंटो प्राप्त ३ विद्यार्थी, गोल्ड मेडल प्राप्त २१ विद्यार्थी, सिल्वर मेडल प्राप्त ३६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. बी. गदळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेतूनही आपले करिअर घडवले पाहिजे. त्या दृष्टिकोनातून यशस्वी वाटचाल केली पाहिजे. यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये विद्यार्थ्यांचा पाया घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान फार महत्त्वाचे असते. शेवटी त्यांनी सर्व स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही अभिनंदन केले.

आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी- यादव हिंदवी विष्णू, मोरलवार कैवल्य गणेश, जगदाळे श्रेयस किरण, चव्हाण अक्षरा सुंदर, यादव पार्थ विष्णू इत्यादी.

डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा-भिसे अभिनव श्रीहरी, सांजुरे आकांक्षा दिपक, लटपटे आर्या राजेंद्र इत्यादी.महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा- मुंडे आर्यन अंगद राज्यातून सर्वप्रथम, चाटे ओंकार सूर्यकांत केंद्रातून सर्वद्वितीय इत्यादी.एम. टी. एस. ऑलंपियाड राज्यस्तरीय परीक्षा- यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय, मोरलवार कैवल्य गणेश जिल्ह्यातून सर्वद्वितीय, लटपटे आर्या राजेंद्र जिल्ह्यातून सहावी हे विद्यार्थी स्पेशल मोमेंटोसाठी पात्र ठरले आहेत.एम.टी.एस. ऑलंपियाड गोल्ड मेडल प्राप्त विद्यार्थी- काकडे अनुष्का बाबासाहेब, चौरे सोहम लक्ष्मण, डोईफोडे आदित्य राजाभाऊ, कांबळे जयराज हरिभाऊ, मोरे संस्कृती दत्ता, खरमाटे सत्यानंद मेघराज, काळे शौर्य सागर, चाटे रोहन संतोष, घोळवे गुंजन धनंजय, कापरे अथर्व अंकुश, जाधव संस्कृती भारत, शेळके हर्षदा संजय, घोडके शिवम संतोष, ठोंबरे श्रेयश श्रीधर, बावगे वेदांत महादेव, देशमुख गौरी गणेश, शेटे सक्षम मिलिंद, ढोबळे प्राची युवराज, क्षीरसागर सिद्धी सचिन इत्यादी.एम.टी.एस. ऑलंपियाड सिल्वर मेडल प्राप्त विद्यार्थी- रणवीर रविंद्र मुंडे, अनुष्का आश्रुबा नागरगोजे, प्रणव स्वप्नील वाघमारे, अपूर्वा उत्तरेश्वर सोनवणे, आरती बिबिशन चाटे, सौम्या सचिदानंद ढेपे, संस्कृती रणजित केदार, अमृता नरसिंग शिंदे, अंजली लक्ष्मण चौरे, आर्या अशोक खोगरे, तनुजा संतोषकुमार बियाणी, श्रेया प्रविण मैंद्रे, अथर्व बाबू इंगोले, रुपाली शिवराज लांब, शिवभक्ती प्रेमानंद स्वामी, रसिका शाहूराव कुलकर्णी आदी उपस्थित होते.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८६ दिनांक-०३/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती नुरेआलम फकीरेआलम शेख रा.पिंपरखेड खु. ता. अंबड जि. जालना यांनी यांचा मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| | नविद नुरेआलम शेख | मुलगा | १५/११/२००४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



### जाहीर प्रगटन

मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड

किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ११६८/२०२५

CNR No.MHBI020000238420 25

मार्फत : ॲड.बी.बी. घुमरे

दाजिआप्पा उर्फ दाजिबा बापुराव आव्हाड व इतर ४ वि. निरक

अर्जदार १. दाजिआप्पा उर्फ दाजीबा पि. बापुराव आव्हाड वय ५७ वर्षे, धंदा-शेती, रा. भवानवाडी ता. जि. बीड २. महादेव पि. दाजीबा आव्हाड, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. भवानवाडी ता. जि. बीड ३. शहादेव पि. दाजीबा आव्हाड, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा.भवानवाडी ता. जि. बीड ४. उर्मिला भ्र. लक्ष्मण सानप, वय ४३ वर्षे, धंदा घरकाम, रा. भवानवाडी ता. जि. बीड ५. अर्चना भ्र. शहादेव नागरगोजे, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा. येवलवाडी ता. पाटोदा जि. बीड

विरुद्ध निरंक

मागणी अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून मिळणे बाबत.

वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या न्यायालयात मयत मिनाबाई भ्र. दाजीबा आव्हाड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत मिनाबाई भ्र. दाजीबा आव्हाड यांचा मृत्यु दिनांक १५/०२/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय बीड ता. जि. बीड येथे त्यांचा मृत्यु झाला वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे.अर्जदार क. १ ही मयताया पत्नी असून अर्जदार क्र. २ व ३ हे मयत्ताचे मुले आहेत व अर्जदार भ्र. ४ व ५ या मयताच्या विवाहित मुली आहेत तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत

मयत मिनाबाई भ्र. दाजीबा आव्हाड यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कात त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. प्रकरणातील पुढील तारीख २१/०८/२०२५

आज दिनांक २१ माहे जुलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

**स्वाक्षरीत**
**क. लिपिक**

**आदेशावरुन**
**स्वाक्षरीत अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व,स्तर. बीड**

cmyk



# कांदा खरेदी केंद्रांवर नियंत्रणासाठी राज्य सरकारची दक्षता समिती

## आता प्रत्यक्षात कारभारात सुधारणा होणार का याकडे लक्ष

पुणे : केंद्र शासनाच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय हे 'नाफेड' व 'एनसीसीएफ'या केंद्रीय नोडल संस्थेमार्फत कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून किंमत स्थिरता निधी योजनेअंतर्गत कांद्याची खरेदी होते. मात्र यात अनियमितता व भ्रष्टाचाराची अनेक गंभीर प्रकरणे समोर आली. 'ॲग्रोवन'ने गेल्या दोन वर्षांत सातत्याने आवाज उठवीत गैरप्रकार समोर आणले होते. अखेर 'देर आये, दुरुस्त आये', असे धोरण सरकारने हाती घेतले आहे. कांदा खरेदी प्रक्रियेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्यासाठी तसेच खरेदी केंद्रांवर शासनाचे प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी दक्षता समिती नियुक्त केली आहे. ही स्वागतार्ह बाब आहे; मात्र प्रत्यक्षात कारभार सुधारणार का, हा सवाल कायम आहे.

केंद्र शासनातर्फे ग्राहकांना रास्त दरात कांदा उपलब्ध होण्यासाठी बफर स्टॉक केला जातो. यंदा 'नाफेड' व 'एनसीसीएफ'या केंद्रीय नोडल संस्थांकडून १.५ लाख टन कांदा खरेदीचा लक्ष्यांक आहे. त्यानुसार महाराष्ट्रात नाशिक, पुणे, अहिल्यानगर व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खरेदी दीड महिना उशिराने सुरू झाली. गेल्या दोन वर्षांपासून कांदा खरेदीमध्ये अनियमितता आहे. तसेच शेतकरी संघटनांनी शासनाकडे तक्रारी केल्या होत्या. या



मुद्द्यावर शासन गंभीर नसल्याने सरकार टीकेचे धनी झाले. गत लोकसभा निवडणुकीत सरकारला मोठी किंमत मोजावी लागली. तर या भ्रष्टाचारासंबंधी याचिका उच्च न्यायालयात देखील दाखल करण्यात आली आहे. यासह लोकप्रतिनिधींनी शासनाचे यासंबंधी वेळोवेळी लक्ष वेधले. अखेर शासनाला दक्षता पथक नेमण्याचे सुचले. त्यानुसार संबंधित खरेदी केंद्र ज्या तालुक्यात आहे, त्या तालुक्याचे तहसीलदार पथकाचे अध्यक्ष असतील. बाजार समितीचे सचिव हे सदस्य तर सहकार अधिकारी, मंडळ अधिकारी व सहायक निबंधक या तिघांपैकी एक सदस्य सचिव असतील. समितीने अचानक तसेच नियमित तपासणी केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल दर आठवड्याला सोमवारी संबंधित जिल्ह्याचे उपनिबंधक यांच्यामार्फत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांना सादर करावा व त्याची एक प्रत पणन संचालक यांना द्यावी. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी हा अहवाल शासनास सादर करावा, असे शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

दक्षता पथकास या असतील जबाबदाऱ्या

शेतकऱ्यांची नोंदणी सप्लाय व्हॅलिड पोर्टलवर केली आहे का? नोंदणीकृत शेतकऱ्यांपैकी किती शेतकऱ्यांनी कांदा विक्री केली व किती शेतकऱ्यांची कांदा विक्री प्रलंबित आहे. तसेच नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यास किती दिवसांनी कांदा विक्रीस पात्रतेचे मेसेज प्राप्त होतो? खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या ७/१२ वर पीकपेरा सदरात कांदा पिकाची नोंद आहे का?कांदा नोंदणी व खरेदी करतेवेळी स्वतः शेतकरी किंवा त्याचे कुटुंबातील व्यक्ती हजर होती का? शेतकऱ्याला खरेदी केलेल्या कांद्याची वजन पावती दिली जाते का व या पावतीप्रमाणे शेतकऱ्यांची कांदा विक्री पोर्टलला दिसते का? खरेदी केलेल्या कांद्याचे पैसे डीबीटीद्वारे खरेदीनंतर किती दिवसांनी शेतकऱ्यांना प्राप्त होतात? साठवणूक गोदामातील कांद्याचा दर्जा, आकार आहे का? पोर्टलनुसार एकूण खरेदी केलेला कांदा व गोदामात असलेला कांद्याचा हिशेब सर्वसाधारणपणे जुळतो का? नोंदणीकृत शेतकऱ्यांची कांदाविक्री तसेच कांदाविक्री प्रलंबित आहे याबाबत तपशील तपासणीवेळी उपस्थित शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत का? याशिवाय दक्षता पथकाने केलेले निरीक्षण व इतर माहिती. तपासणीत आढळलेली विसंगती व दक्षता समितीचे अभिप्राय.

# मिरचीवरील चुरडा मूरडा रोगाचे व्यवस्थापन

मिरची पिकावर चुरडा मुरडा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. हा एक विषाणूजन्य रोग असुन त्यामुळे पानावर पिवळसर व हिरव्या रंगाचे डाग पडतात व पाने बारिक व वेडीवाकडी होतात अशा पानाचा गुच्छा तयार होऊन रोगट फांदीला झुपक्याचा आकार येतो. नविन फुटीचे छोटया पानात रूपांतर होऊन गुच्छा सारखे दिसतात व झाडाची वाढ पुर्णपणे खुंटते व उत्पादनात ४० ते ५० टक्क्या पर्यंत नुकसान होऊ शकते. या रोगाचा प्रसार रस शोषण करणाऱ्या किडीमुळे होतो म्हणुन मिर्ची पिकावर येणाऱ्या मावा, फुलकिडे, पांढरी माशी व कोळी या किडींबद्दल माहिती व व्यवस्थापनाचे उपाय करणे गरजेचे आहे.

मावा : हि किड काळया किंवा पोपटी रंगाची असते. हया किडींची पिल्ले पंख विरहीत तसेच प्रौढ पंखासहित आढळतात. किड शेंडयावर पानावर खालच्या बाजूस राहून पानातील रस शोषूण घेते त्यामुळे झाडाची वाढ खुंटते व पाने निस्तेज दिसतात. तसेच हि किड आपल्या शरीरातून चिकट द्रव्य बाहेर सोडते त्यावर उष्ण व दमट हवामानात काळया रंगाची बुरशी वाढुन प्रकाश संश्लेषन कियेत अडथळा निर्माण होते, अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत बाधा निर्माण होऊन झाडाची वाढ खुंटते. या किडीची जिवन चक १० ते १२ दिवसात पुर्ण होते व एका वर्षात १२ ते १४ पिढया सहज पुर्ण होतात.

पांढरी माशी : पांढ्या माशीचे शरीर



पिवळे व पंख पांढरे असतात, ती पानातून व फुलातून रस शोषन करून नुकसान पोहचविते. वाढलेले तापमान व आर्दता या किडीच्या वाढीस पोषक आहे. या किडीचे जिवनचक २५ते ३५ दिवसात पूर्ण होते तर वर्षाभरात ९ ते १० पिढया पूर्ण होतात.

फुलकिडे : हि किड अतिशय सुक्ष्म असुन तिचे शरीर लांबट आकारचे असते. किड पानावर तसेच फळावर पेशी खरबडून त्यातुन निघालेला रस शोषुन घेते त्यामुळे पाने वेडीवाकडी होतात तर फळावर खरबडल्यासारखे चट्टे दिसतात झाडाची वाढ थांबुन पाने व कळयाची गळ होते.

कोळी : हि अष्टपाद वर्गातील किड असुन आकाराने अतिशय सुक्ष्म असते. पिवळसर रंगाचे कोळी पानावर राहून रस शोषुन घेतात. प्रादुर्भाव ग्रस्त झाडाची पाने खालच्या दिशेने वाकडी होतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास झाडाची वाढ खुंटते तसेच फुले व कळया गळण्याचे प्रमाण वाढते.व्यवस्थापन : पेरणीपूर्वी गादीवाफ्याला पाणी देऊन ०.४५ मिमि जाड प्लास्टिकच्या शिटने तिन आठवडे झाकुन ठेवावे. त्यामुळे उष्णतेने मातीचे निरजंतूकरण होते व मातीमधील हानीकारक बुरशी तसेच किडीची नायनाट होतो. पांढ्या माशीच्या व्यवस्थानासाठी पिवळया रंगाचे तर फुलकिडयासाठी निळया रंगाचे चिकट सापळे लावावेत. शेताच्या चहूबाजुनी मका, चवळी व झेंडू च्या तिन ओळी लावाव्या या पिकांवर क्रायसोपा, लेडी बर्ड बिटल इत्यादी परभक्षी किटकाची वाढ होऊन रस शोषण करणाऱ्या किडींच्या नियंत्रणास मदत होते. सुवातीच्या अवस्थेत चुरडा मुरडा रोगग्रस्त झाड आढळल्यास त्वरीत उपटून नष्ट करावे जेणेकरून पुढील प्रादुर्भावास अटकाव करता येईल. नत्र युक्त खताचा वापर शिफारशीत मात्रेतच करावा. मिरची पिकाचे वेळोवेळी सर्वेक्षण करून रस शोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येताच. घरी तयार केलेल्या ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. रस शोषण करणाऱ्या किडीच्या व्यवस्थानासाठी इमीडाक्लोप्रीड ७० टक्के डब्ल्युएस १० ग्रॅम किंवा थायोमेक्थाझाम ३० एफएस ७ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणे बिज प्रक्रिया करावी. रासायनिक किटकनाशकाची फवारणी करावयाची असल्यास शिफारशीत किटकनाशके. जसे डायमेथोएट ३० ईसी १४ मिली किंवा फिप्रोनील ५ एससी २० मिली किंवा फेनप्रोथिऑन ३० टक्के ३.५ मिली किंवा इथिऑन ५० ईसी ४० मिली यापैकी कोणतेही एक किटकनाशक प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. एकचएक किटकनाशक पुन्हा पुन्हा न वापरता आलटून पालटून वापरावे.


# काळी हळद लागवडीची योग्य पद्धत अन् ५०% टक्क्यांपर्यंत अनुदान

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. अनेक राज्य सरकारे शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीसोबतच औषधी पिकांच्या लागवडीला प्रोत्साहन देत आहेत. यासाठी शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभही दिला जातो. औषधी पिकांच्या लागवडीवर शासनाकडून ५० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. अशा परिस्थितीत शेतकरी औषधी पिकांची लागवड करून उत्पन्न वाढवू शकतात. या औषधी पिकांमध्ये काळी हळद देखील आहे. त्याची लागवड करून शेतकरी चांगला नफा मिळवू शकतात. त्याची बाजारात मागणी जास्त आहे, तर त्याचे उत्पादन कमी आहे. अशा परिस्थितीत शेतकरी आपल्या शेताच्या काही भागात काळ्या हळदीची लागवड करून चांगला नफा मिळवू शकतात.

काळी हळद काय आहे : काळ्या हळदीचे कंद किंवा राइझोम सुकल्यावर दंडगोलाकार, गडद रंगाचे कठीण स्फटिक बनतात. राइझोमचा रंग काळा असतो. त्याची वनस्पती स्टेमलेस हर्बेसियस आणि ३० ते ६० सेमी उंच आहे. उंच उगवते. पाने वरच्या पृष्ठभागावर निळसर-जांभळ्या मधोमध शिरा असलेली रुंद लॅन्सोलेट आहेत. फुले गुलाबी रंगाची असतात आणि काठावर कोटिलेडॉन असतात.

काळ्या हळदीचा उपयोग : काळी हळद आपल्या चमत्कारिक गुणधर्मामुळे देश-विदेशात खूप प्रसिद्ध आहे. काळी हळद प्रामुख्याने कॉस्मेटिक आणि रोग-नाशक अशा दोन्ही प्रकारात वापरली जाते. मजबूत प्रतिजैविक गुणधर्म असलेल्या औषधी वनस्पती म्हणून काळी हळद वापरली जाते. काळ्या हळदीचा उपयोग जखमा, मोच, त्वचा रोग, पचन आणि यकृताच्या समस्या बरे करण्यासाठी केला जातो. हे कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करते.

माती आणि हवामान : काळ्या हळदीच्या लागवडीसाठी १५ ते ४० अंश सेंटीग्रेड तापमान योग्य मानले जाते. त्याची झाडे दवं देखील सहन करतात आणि प्रतिकूल हवामानातही त्यांचे



अनुकूलन टिकवून ठेवतात. त्याच्या लागवडीसाठी वालुकामय, चिकणमाती, मटियार, मध्यम जमीन ज्याची पाणी धरून ठेवण्याची क्षमता चांगली आहे. याउलट, चिकणमाती, मिश्र मातीत कंद वाढत नाहीत. त्याच्या लागवडीसाठी, जमिनीत भरपूर जीवाश्म असावेत. पाणी साचलेल्या किंवा कमी सुपीक जमिनीत त्याची लागवड केली जात नाही. त्याच्या लागवडीसाठी जमिनीचा पीएच. ५ ते ७ च्या दरम्यान असावा.

काळ्या हळदीसाठी लागवडीची तयारी : सर्व प्रथम, जमिनीच्या वळणाच्या नांगराने शेताची खोल नांगरणी करा. त्यानंतर सूर्यप्रकाश मिळण्यासाठी शेत काही दिवस मोकळे सोडावे. त्यानंतर शेतात योग्य प्रमाणात जुने शेणखत टाकून ते जमिनीत चांगले मिसळावे. खत जमिनीत मिसळण्यासाठी शेताची दोन ते तीन तिरपी करा. नांगरणीनंतर शेतात पाणी टाकून ते स्वच्छ करावे. नांगरणीनंतर जेव्हा शेताची माती वरून कोरडी दिसू लागते तेव्हा पुन्हा शेतात नांगरणी केल्यावर त्यामध्ये रोटाव्हेटर चालवून माती बारीक करावी. त्यानंतर फील्ड लेव्हल करा.

काळ्या हळदीसाठी पेरणीची योग्य वेळ : काळ्या हळदीच्या पेरणीसाठी योग्य काळ हा पावसाळा मानला जातो. पेरणीसाठी सर्वोत्तम वेळ जून-जुलै आहे. मात्र, सिंचनाचे साधन असल्यास मे महिन्यातही पेरणी करता येते.

काळी हळद बियांचे प्रमाण : काळ्या हळदीच्या लागवडीसाठी हेक्टरी २० क्विंटल कंद आवश्यक आहेत. त्याच्या कंदांना लावणीपूर्वी योग्य प्रमाणात बाविस्टिनची प्रक्रिया करावी. कंद बाविस्टिनच्या २% द्रावणात १५ ते २० मिनिटे बुडवून ठेवावेत कारण त्याच्या लागवडीत बियाण्यांवर जास्त खर्च होतो.

काळी हळद पेरण्याची/लावणीची पद्धत : काळ्या हळदीचे कंद ओळीत लावले जातात. प्रत्येक ओळीत दीड ते दोन फूट अंतर असावे. ओळीत लागवड करावयाच्या कंदांमधील अंतर सुमारे २० ते २५ सें.मी. पाहिजे कंदांची लागवड जमिनीत ७ सें.मी. खोलवर केले पाहिजे. रोपाच्या स्वरूपात, त्याच्या लागवडीच्या कड्यांमध्ये एक ते दीड फूट अंतर असावे. रिजवरील वनस्पतींमधील अंतर २५ ते ३० सें.मी. पाहिजे प्रत्येक मेंढ्याची रुंदी सुमारे अर्धा फूट ठेवावी.

काळी हळद वनस्पती कशी तयार करावी : काळ्या हळदीची रोपे तयार करूनही लागवड करता येते. त्याची रोपे तयार करण्यासाठी, ट्रे किंवा पॉलिथिनमध्ये माती भरून त्याचे कंद लावले जातात. त्याच्या कंदांना लावणीपूर्वी योग्य प्रमाणात बाविस्टिनची प्रक्रिया करावी. पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतात लागवड केली जाते.

काळी हळद लागवडीमध्ये सिंचनाची कामे : सिंचन काळा लवकर झाडांना जास्त सिंचनाची आवश्यकता नसते. त्याचे कंद ओलसर जमिनीत लावले जातात. त्याचे कंद किंवा रोपे लावणीनंतर लगेच पाणी द्यावे. सौम्य उष्ण हवामानात, त्याच्या झाडांना १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. तर हिवाळ्यात १५ ते २० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

खत देण्याचे प्रमाण : शेत तयार करताना जुने शेणखत मातीत मिसळून झाडांना द्यावे. एकरी १० ते १२ टन कुजलेले शेण टाकावे. घरी तयार केलेले जीवामृत झाडांना सिंचनासोबत द्यावे.

तण नियंत्रण : रोपे लावल्यानंतर २५ ते ३० दिवसांनी हलकी खुरपणी करावी. तण नियंत्रणासाठी ३ कुंडी पुरेशी आहे. प्रत्येक खुरपणी २० दिवसांच्या अंतराने करावी. लावणीनंतर ५० दिवसांनी खुरपणी थांबवावी, अन्यथा कंद खराब होतात.

मुळे घाण करणे : लावणीनंतर २ महिन्यांनी झाडांच्या मुळांना माती लावावी. प्रत्येक एक ते दोन महिन्यांनी झाडांच्या मुळांमध्ये अर्थिंगचे काम करावे. उसासारखा दिसणारे हे गवत शेतकऱ्यांचे उत्पन्न तर वाढवेलच, पशुखाद्याचे संकट ही दूर करणार, दर ५० दिवसांनी काढणीस तयार

कापणी : काळ्या हळदीचे पीक लावणीपासून २५० दिवसांनी काढणीसाठी तयार होते. कंद खोदण्याचे काम जानेवारी-मार्चमध्ये केले जाते.

उत्पन्न आणि नफा : योग्य पद्धतीने लागवड केल्यास एका एकरात सुमारे ५०-६० क्विंटल कच्ची हळद म्हणजेच सुमारे १२-१५ क्विंटल कोरडी हळद मिळू शकते. काळी हळद बाजारात सहज ५०० रुपयांना विकली जाते. ४००० रुपये किलोपर्यंत काळी हळद विकणारे शेतकरीही आहेत. इंडियामार्ट सारख्या ऑनलाइन वेबसाइटवर तुम्हाला काळी हळद ५०० ते ५००० रुपयांना विकताना आढळेल. जर तुमची काळी हळद बाजारात फक्त ५०० रुपयांना विकली गेली तर १५ क्विंटलमध्ये तुम्हाला ७.५ लाख रुपयांचा नफा मिळेल. बियाणे, नांगरणी, सिंचन, खोदकाम यासाठी तुम्ही अडीच लाख रुपयांपर्यंत खर्च केला तरीही तुम्हाला ५ लाख रुपयांचा नफा मिळेल.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९०८ : 'देशाचे दुर्दैव' हा जहाल अग्रलेख लिहिल्याबद्दल लोकमान्य टिळकांना ६ वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा
१९३१ : फ़र्ग्युसन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात वासुदेव बळवंत गोगटे यांनी सर जॉन हॉटसन या मुंबई प्रांताच्या राज्यपालावर गोळया झाडल्या. हॉटसन वाचला. पुढे हे 'हॉटसन' गोगटे पुण्याचे महापौर बनले.
१९३३ : विली पोस्ट या वैमानिकाने एकटयाने ७ दिवस १८ तास व ४९ मिनिटे या विक्रमी वेळात विमानातून पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण केली.
१९४२ : वॉर्सा मधुन ज्यूंना हद्दपार करणे सुरू झाले.
१९४४ : पोलंडमधे कम्युनिस्ट राजवटीची सुरुवात झाली.
१९४६ : इर्गुनया दहशतवादी संघटनेने जेरुसलेम मधील ब्रिटिश मुख्यालयावर बॉम्ब हल्ला केला. त्यात ९० ठार.
१९४७ : राष्ट्रीय ध्वजाचा स्वीकार.
१९७७ : चीनचे नेते डेंग क्सियाओ पिंग पुन्हा सत्तेवर आले.
१९९३ : वेषभूषाकार भानू अथैय्या यांना अमेरिकेतील ॲकेडमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट अँड सायन्स या संघटनेचे सदस्यत्त्व देण्यात आले. या सदस्यांना प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्काराबाबत मत देण्याचा अधिकार आहे.
१९९९ : आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने समान कामांसाठी समान वेतन ही योजना लागू केली.
२००१ : जागतिक जलतरण स्पर्धेत ऑस्ट्रेलियाचा मातब्बर जलतरणपटू इयान थॉर्प याने आपला पहिला विश्वविक्रम केला. त्याने ४०० मीटर फ्रीस्टाईल शर्यत ३ मिनिटे ४०.१७ सेकंद अशा विक्रमी वेळात जिंकली.
२००३ : अमेरिकेच्या लष्करी सैन्याने इराकवर केलेल्या बॉम्ब हल्ल्यात इराक शासक सद्दाम हुसेन यांची मुले मारली गेली.
२०१२ : भारताच्या राष्ट्रपती पदावर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे राजकरणी, प्रणव मुखर्जी यांची नियुक्ती करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८७ : जर्मन भौतिकशास्त्रज्ञ गुस्तावलुडविग हर्ट्झ यांचा जन्म.
१८९४ : भारतातील पहिल्या लोकसभेचे सदस्य सरदार तेज सिंह अकरपुरी यांचा जन्मदिन.
१८९८ : पं. विनायकराव पटवर्धन भारतीय शास्त्रीय संगीताच्या ग्वाल्हेर घराण्यातील गायक (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७५)
१९१५ : भारतीय-पाकिस्तानी राजकारणी आणि राजनयिक शैस्ता सुहरावर्दी इकामुल्ला यांचा जन्म. (मृत्यू: ११ डिसेंबर २०००)
१९२३ : मुकेश चंद माथूर तथा 'मुकेश' पार्श्वगायक. तीस वर्षांच्या फिल्मी कारकिर्दीत त्यांनी १०,००० हून अधिक गीतांना आवाज दिला. ऊर्दू, पंजाबी, तमिळ, बंगाली, मराठी, गुजराथी या भाषांतही त्यांनी गाणी गायली. अनुनासिक स्वर आणि गायकीत ओतप्रोत भरलेलाअ 'दर्द' ही त्यांच्या गायनशैलीची वैशिष्ट्ये होती. (मृत्यू: २७ ऑगस्ट १९७६)
१९२५ : गोविंद तळवलकर पत्रकार (२७ वर्षे महाराष्ट्र टाइम्सचे संपादक) व लेखक. भारत सरकारचा लोकमान्य टिळक पुरस्कर सन्मानित महाराष्ट्रीयन प्रतिष्ठित पत्रकार, इंग्रजी वृत्तपत्र महाराष्ट्र टाईम्सचे दिग्गज संपादक, इतिहासकार, अभ्यासक, समाजसुधारक व लेखक
१९३७ : वसंत बाबुराव रांजणे मध्यमगती गोलंदाज (मृत्यू: २२ डिसेंबर २०११)
१९६५ : रॅमन मॅग्सेसे पुरस्कार सन्मानित भारतीय सामाजिक कार्यकर्ते व आशा संस्थेचे एक संस्थापक व सदस्य संदीप पांडे यांचा जन्मदिन.
१९७० : महाराष्ट्राचे विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्म.
१९९२ : अमेरिकन गायक व अभिनेत्री सेलेना गोमेझ यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५४० : हंगेरीचा राजा जॉन झापोल्या यांचे निधन.
१८२६ : इटालियन खगोलशास्त्रज्ञ ज्युसेप्पे पियाझी यांचे निधन.
१९१८ : इन्दर लाल रॉय पहिल्या महायुद्धातील भारतीय पायलट (जन्म: २ डिसेंबर १८९८)
१९४८ : स्वातंत्र्य पूर्व भारतातील प्रसिद्ध भारतीय चित्रकार हेमेंद्रनाथ मजूमदार यांचे निधन.
१९८४ : गजानन लक्ष्मण तथा ग. ल. ठोकळ उत्कृष्ट मराठी कथा लेखक, साहित्यिक व प्रकाशक (जन्म: १९०९)
१९८७ : माजी भारतीय कसोटी क्रिकेटपटू ए. जी. क्रिपाल सिंह यांचे निधन.
१९९५ : हेरॉल्ड लारवूड इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १४ नोव्हेंबर १९०४)
२००३ : कुसय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १७ मे १९६६)
२००३ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (जन्म: १८ जून १९६५)

# टोमॅटो लागवड पध्दत

टोमॅटो पिकास स्वच्छ, कोरडे, कमी आर्द्रता असलेले व उष्ण हवामान चांगले मानवते. साधारणतः १८ ते ३० अंश सेल्सिअस तापमानात हे पीक चांगले येते. तापमान ३८ अंश सेल्सिअसवर गेल्यास पिकाची शारीरिक क्रिया मंदावते व पेशींना इजा होते. तसेच तापमान जर १० अंश सेल्सिअसखाली गेले, तरी पिकाच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो.

पिकास इजा होऊन उत्पादनात मोठी घट येते. जास्त तापमान, कमी आर्द्रता आणि कोरडे वारे असतील, तर टोमॅटो पिकाची फुलगळ होते. उष्ण तापमान व भरपूर सूर्यप्रकाश असणाऱ्या हवामानात टोमॅटो फळांची गुणवत्ता ही चांगली असते, तर रंगदेखील



आकर्षक येतो. चांगला निचरा असलेल्या मध्यम काळया जमिनीत किंवा पोयट्याच्या जमिनीत हे पीक चांगले येते. हलक्या जमिनीत पीक लवकर निघते, तर भारी जमिनीत फळांचा तोडा उशिरा सुरू होतो; परंतु उत्पादन भरपूर निघते. उन्हाळी टोमॅटो पीक हलक्या व उथळ जमिनीत घेऊ नये. जमिनीचा सामू ६ ते ७.५ दरम्यान असावा.

cmyk

# खड्डा झाला पालकमंत्री तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची पिलावळं

## नव पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यांना बारामती दाखवा – उल्हास गिराम

बीड। प्रतिनिधी

बीड शहर मरणयातना भोगत आहे. उघडे रोहित्र, उघड्या नाल्या, सर्वत्र खड्डे, कचऱ्याचे ढिगारे, शहरवासियांच्या पिण्याच्या पाण्याचं नियोजन या सारख्या शेकडो समस्या म्हणजे शहरवासियासाठी मरणयातनाचं, पालकमंत्री म्हणून अजितदादा पवार आपण लक्ष घाला, बारामती जशी महाराष्ट्रासाठी आयडॉल आहे तसे बीड करा, बीड मध्ये नवं पर्वाची थीम घेऊन मिरवणाऱ्यानां आपली बारामती दाखवा. दादा आपणाकडुन शहरवासियांच्या खुप अपेक्षा आहेत याला तडा जाऊ देऊ नका. आज शिवसैनिकांनी एका खड्डयाचे नमकरण पालकमंत्री केले तर बाकी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळं असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

आज बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस या मार्गांवर असणाऱ्या खड्डया संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन निदर्शने करण्यात आली. या मार्गांवरील मुख्य खड्डयाला पालकमंत्री खड्डा असे नाव देऊन खड्डयाचे नामकरण करण्यात आले, तर बाकी छोटी – मोठी खड्डे पालकमंत्र्याची लाभार्थी पिलावळे असल्याचे शिवसैनिकांनी जाहीर केले. खड्ड्यात पालकमंत्र्याची प्रतिमा ठेऊन गुलाल बुक्का व हार घालून, ढोल तशे वाजवून जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी लक्षावेधी आंदोनल केले. बीड शहरातील प्रमुख रस्ता म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस हा होय, या मार्गांवर आज शेकडो खड्डे आहेत. या मार्गांवर नगर पालिका आहे, जिल्हा परिषद आहे. याच मार्गे विध्यार्थी शाळा- महाविद्यालयात जातात, जिल्हा रुग्णालयात नागरिक जातात, ग्रामीण भागातील शेतकरी आपला भाजीपाला घेऊन याच मार्गे बाजारपेठेत जातात, स्थानिक व्यापारी याच मार्गांवर आपले व्यवसाय करतात. अजितदादा आपण पालकमंत्री आहात, आपण एकदा शहरात फिरून सर्वे करावा म्हणजे शहरवासीयांच्या समस्या लक्षात येतील. आपणा पुढे नवपर्वांची थीम घेऊन मिरवणाऱ्या पिलावळींनां थोडी समाज द्या, त्यांना आपली बारामती फिरून दाखवा, बीड ची भानामती होऊ देऊन नका असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.यावेळीमहिला संघटिका मीराताई नवले ,उपजिल्हाप्रमुख संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, रतन तात्या गुजर, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे ,नवनाथ प्रभाळे , थिगळे विशाल , गणेश लोणकर ,विनोद गोरख ,जगदीश गिराम ,प्रदीप कोठुळे, सतीश सिंह परदेशी, शरद पवार, दिलीप पवार , मच्छिंद्र काळे, चंदूनाना कागदे, प्रेम ताकतोडे, बळी कोटुळे, विशाल तांबे आदी शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.





## सेवा संकल्प सप्ताह: आज अजितदादांचे अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यान

### मोठ्या संख्येने उपस्थित रहा– सोळंके, धर्माधिकारी यांचे आवाहन

परळी वैजनाथ, प्रतिनिधी...

**उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार व आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, परळी वैजनाथ आयोजित सेवा संकल्प सप्ताहात आज (२२ जुलै) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन, विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण, गुणवंतांचा गुणगौरव व शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा होणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वैजनाथ सोळंके व बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी केले आहे.**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदीर, परळी वैजनाथ येथे आज २२ जुलै रोजी सकाळी १०:०० वाजता हा सोहळा सुरु होणार आहे. या सोहळयास उद्घाटक म्हणून अप्पर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई अश्विनी सोनवणे (जिरंगे) तर अध्यक्षस्थानी जि. प. गटनेते अजय मुंडे राहणार आहेत. याप्रसंगी शिक्षणतज्ञ व अभियांत्रिकी महाविद्यालय सल्लागार समिती, महाराष्ट्र राज्य संचालक प्रा.महेश पाटील सर यांचे शैक्षणिक मार्गदर्शनपर व्याख्यान होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विभाग, बीड शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग शिक्षणाधिकारी भगवान फुलारी,उपविभागीय अधिकारी परळी वैजनाथ अरविंद लाटकर, दिव्यांग कल्याण महामंडळ महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, तहसिलदार परळी वैजनाथ व्यंकटेश मुंडे, न.प. मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात सेवा संकल्प सप्ताहात घेण्यात आलेल्या योगासन स्पर्धा, मृदंग वादन स्पर्धा, महिला भजन स्पर्धा, शालेय सांस्कृतिक स्पर्धा महोत्सव शहर व ग्रामीण, सामान्य ज्ञान स्पर्धा, रील्स स्पर्धा या विविध स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात येणार आहेत. तसेच गुणवंतांचा गुणगौरव सोहळा होणार आहे. तरी या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व सर्व पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जुना बाजार कोतवाली वेस पर्यंत रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा

### अन्यथा १४ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन अमरजान पठाण

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस,कारंजा रोड,बलभीम चौक,जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतच्या रस्त्याचा काम तात्काळ सुरू करण्यात यावा अन्यथा येत्या १४ ऑगस्ट रोजी सकाळी ११:०० वाजता बीड नगरपरिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष अमरजान पठाण यांनी आज दिला.

पठाण यांनी दिलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले की, बीड शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा रोड, बलभीम चौक, जुना बाजार ते कोतवाली वेस पर्यंतचा हा रस्ता नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा असून सध्या याची दुरवस्था झाली आहे. रस्त्यावर



ठिकठिकाणी खोल खड्डे पडले असून, पावसामुळे ते जलमय झाले आहेत. त्यामुळे वाहतुकीस अडथळा तर निर्माण झालाच आहे, शिवाय कोणताही जीवघेणा अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे.हा रस्ता शहरातील प्रमुख व्यापारी मार्ग असून, दररोज जिल्हाभरातून व्यापारी व नागरिक या भागात ये – जा करतात. रस्त्याची ही अवस्था नागरिकांच्या संयमाचा अंत पाहणारी ठरत आहे. मनसेने प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तात्काळ रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली नाही,तर १४ ऑगस्ट गुरुवार रोजी सकाळी ११:०० वाजल्या पासून बीड नगर परिषदेसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असे बीड नगरपरिषद कार्यालय, कार्यकारीअभियंता बीड,व जिल्हाधिकारी कार्यालयात दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये वक्तृत्व स्पर्धा

बीड। प्रतिनिधी

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय शाहूनगर बीड या विद्यालयाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा ३१ जुलै २०२५ रोजी संपन्न होणार आहेत आणि या वकृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे.

या सदरील वकृत्व स्पर्धा प्राथमिक गट इयत्ता ५ वी ते ७ वी वर्ग आणि माध्यमिक गट ८ वी ते १० वी या दोन गटांमध्ये राहील. स्पर्धेचे विषय प्राथमिक गट साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे क्रांतिकारी साहित्य आणि माध्यमिक गट जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव हे राहतील प्रत्येक गटासाठी एक स्पर्धक विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. विद्यार्थी स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका मंगळवार दि.२९ जुलै २०२५ पर्यंत सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत नोंदवावीत.सदरील स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय शाहूनगर बीड येथे गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोज सकाळी १० वाजता संपन्न होतील. या स्पर्धेसाठी प्राथमिक गट व माध्यमिक गट यासाठी प्रथम बक्षीस ५०१ रुपये, द्वितीय बक्षीस ३०१ रुपये, तृतीय २०१ रुपये व प्रमाणपत्र असे राहील. या वकृत्व स्पर्धेत स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

## महर्षी कनाद शाळा परिसरात वृक्षारोण करत काढली वृक्षदिंडी

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपाच्या वतीने आयोजित केलेल्या ''वृक्ष लागवड पंधरवाडा'' अंतर्गत शहरातील नामांकित असलेल्या महर्षी कनाद शाळा परिसरात विद्यार्थ्यांसह वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध वृक्षांची रोपे हातात घेऊन वाजत – गाजत ''वृक्ष दिंडी'' काढून जनजागृती केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ''एक पेड माँ के नाम'' या मोहिमेअंतर्गत, पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपतर्फे वृक्ष लागवड पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. याअंतर्गत आज महर्षी कनाद शाळा परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. यात विद्यार्थी मोठय़ा संख्येने सहभागी झाले. यावेळी सेवानिवृत्त शिक्षिका सौ. भंडारी,भेल स्कूल, श्रीमती तोतला,



श्रीमती रोडगे, सौ.बजाज, सरस्वती विद्यालय यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच सौ. शर्मिला जैन, सौ. लता तातेड, सौ. प्रभा शेटे, सौ.मिना तोतला, सौ.तारावती बंसल यांचीही प्रमुख उपस्थिती होती. शाळेचे मुख्याध्यापक मुंडे आणि त्यांचे सहकारी यांनी वृक्ष लागवड मोहिमेस विशेष सहकार्य केले. महर्षी कनाद शाळा परिसरामध्ये वृक्ष लागवड करण्यापूर्वी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध झाडांची रोपे हातामध्ये घेऊन ढोल ताशांच्या गजरामुळे वृक्षदिंडी काढली. विद्यार्थ्यांच्या वृक्ष दिंडीने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ''झाडे लावा– झाडे जगवा'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. महर्षी कनाद शाळा आणि परिसरात वढ, पिंपळ आदी वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे, महादेव ईटके, मार्केट कमिटीचे संचालक जयपाल लाहोटी, बंडू नाना कोरे, विकास हालगे, नरेश पिंपळे, दिलीप नेहरकर, वैजनाथ रेकने, सुशील हरूंगुळे, विजय दहिवाळ, वैजनाथ पवार, जाजु आदी उपस्थित होते.

## माधवी शरदराव कुलकर्णीचे सी.ए. इंटरमीडिएट परीक्षेत यश.

गेवराई । प्रतिनिधी

येथील ज्येष्ठ विधीज्ञ अँड. डी. एम. कुलकर्णी यांची नात व विधीज्ञ अँड. शरद कुलकर्णी यांची सुकन्या हिने नुकत्याच झालेल्या अत्यंत कठीण अशा सी. ए. इंटरमीडिएट परीक्षेत प्रथम प्रयत्नातच घवघवीत यश प्राप्त केले. माधवी कुलकर्णी हिने अथक परिश्रम व आपल्या आई-वडिलांचे मार्गदर्शनाने प्रथम प्रयत्नातच चार्टर्ड अकाउंट इंटरमीडिएट परीक्षेत ग्रुप ए व ग्रुप बी या दोन्ही ग्रुपमध्ये घवघवीत यश प्राप्त केले आहे. व सी.ए. इंटरमीडिएट यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. माधवी कुलकर्णी हिचे दहावी पर्यंतचे शिक्षण गेवराई येथील इंदिरा गांधी इंग्लिश स्कूल येथे झाले असून त्यानंतरचे महाविद्यालयीन शिक्षण हे बलभीम कॉलेज, बीड येथे झाले आहे.



इयत्ता बारावी उत्तीर्ण झाल्या नंतर माधवी हिने चार्टर्ड अकाउंटंट या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला व सी. ए. च्या प्रथम वर्षाच्या फाउंडेशनच्या परीक्षेत माधवी कुलकर्णी हिने प्रथम प्रयत्नातच यश प्राप्त केले होते. व तीच परंपरा माधवी कुलकर्णी यांनी कायम ठेवून सी.ए. इंटरमीडिएट या कठीण परीक्षेच्या ग्रुप ए व ग्रुप बी या दोन्ही ग्रुपमध्ये प्रथम प्रयत्नातच यश प्राप्त केले आहे.


## नगररोड रस्त्यावर ''यू-टर्न''बसविण्यासाठी अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून तांत्रिक कारणे देत टाळाटाळ

### डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याकडून यू-टर्न करण्याची पुन्हा मागणी

बीड । प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यानच्या रस्त्यावर ''यू-टर्न''साठी दुभाजकात जागा सोडलेली नाही. या मार्गावरच्या उत्तरेकडील बाजूस जिल्हा न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिणेकडील बाजूस शासकीय आरोग्य प्रशिक्षण केंद्र, शासकीय विश्रामगृह, पंचायत समिती, चंपावती क्रीडा मंडळ अशी अनेक महत्त्वाची ठिकाणे आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना नगरनाका गाठून पाऊण किलोमीटरचा फेरा मारावा लागतो. यामुळे नागरिकांना मोठी अडचण निर्माण झाली असून, याकडे प्रशासन लक्ष देताना दिसत नाही. अभियंता राजेंद्र भोपळे यांच्याकडून तांत्रिक कारणे देत टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

यापूर्वी या मार्गावर सहा ठिकाणी ''यू-टर्न''ची सोय होती, मात्र यावेळी एकही ठेवण्यात आलेला नाही. सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदने



दिली, आंदोलने केली, लोकप्रतिनिधींनीही जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठका घेतल्या, स्थानिक दैनिकांनी वारंवार प्रश्न उपस्थित केला तरी राज्य महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता राजेंद्र भोपळे यांनी ''अपघात टाळण्यासाठी यू-टर्न नाही'' असा युक्तिवाद करून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते चऱ्हाटा फाटा दरम्यान केवळ तीन ठिकाणी (नगरनाका, धानोरा रोड, कालिकानगर कमान) यू-टर्न दिले आहेत. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय किंवा तहसील कार्यालयासमोर यू-टर्न देण्यास ''तांत्रिक अडचण'' असल्याचे सांगून त्यांनी असहमती दर्शवली आहे. मग बीड शहरांतर्गत धुळे – सोलापूर महामार्गावरील दुभाजक नसल्याने होत असलेले अपघात त्यांच्या डोळ्यांना दिसत नाहीत का? त्यांना मोतिबिंदू झालाय का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

धुळे – सोलापूर राष्ट्रीय महामार्ग बाह्यवळणाद्वारे वळवण्यात आला असला तरी शहरातील १२ किमी रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट आहे. हा रस्ता फक्त दोन लेनचा असल्याने वाहतुकीची कोंडी होते. दुभाजक नसल्याने वाहने कोठूनही वळतात आणि अपघातांचा धोका वाढतो. या रस्त्याचे चौपदरीकरण मागील सहा वर्षांपासून रखडले आहे. दोन वर्षांपूर्वी मजबुतीकरणाचे काम झाले, पण रस्ता अरुंदच राहिला. फक्त बसस्थानक महावितरण कार्यालय आणि बसस्थानक जिल्हा रेशीम कार्यालय दरम्यानच दुभाजक आहेत; उर्वरित रस्त्यावर दुभाजक नाहीत. या मार्गावर तासाभरात हजारो वाहने धावतात बस, खासगी गाड्या, दुचाकी, रिक्षा, मालवाहू ट्रक. पावसाळ्यात मातीमुळे वाहने घसरतात, राष्ट्रवादी भवन ते बार्शी रोडवर तर जागोजागी खड्डे आहेत. म्हणूनच या मार्गावर तातडीने दुभाजक बसवावेत, सिग्नल व्यवस्था सक्षम करावी आणि चौपदरीकरणाचे काम त्वरीत सुरू करावे, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

## शिक्षकांनी पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष द्यावे-गौड




बीड । प्रतिनिधी

जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. त्यामुळेच अतिवृष्टी-अनावृष्टी, दुष्काळ किंवा महापूर अशा संकटांचा सामना मानवजातीला करावा लागत आहे. पर्यावरणमधे समतोल साधण्यासाठी शिक्षकांनी पर्यावरण संवर्धनाकडे लक्ष द्यावे असे आवाहन अखिल भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे सरचिटणीस सदानंद गौड यांनी केले.

मराठवाडा शिक्षक संघाच्या केंद्र कार्यकारिणी बैठकी निमित्त ते बीड येथे आले होते. त्याचे औचित्य साधून मराठवाडा शिक्षक संघ व अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघ (एआयएसटीएफ) यांच्या तर्फे संस्कार प्राथमिक विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, अखील भारतीय माध्यमिक शिक्षक संघाचे कार्याध्यक्ष तथा आंध्रप्रदेश विधानपरिषदेतील माजी शिक्षक आमदार कट्टी नरसिंम्हा रेड्डी, सहसचिव गुफरान अन्सारी, मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही.जी.पवार, सरचिटणीस राजकुमार कदम, कोषाध्यक्ष ए. बी. औताडे व मराठवाडा शिक्षक संघाच्या केंद्र कार्यकारिणी सदस्यांची उपस्थिती होती. त्यानंतर झालेल्या मराठवाडा शिक्षक संघाच्या केंद्र कार्यकारिणी बैठकीस त्यांनी मार्गदर्शन केले.

देशभर सरकारी शाळेत शिक्षकांच्या हजारो जागा रिक्त असून सार्वजनिक शिक्षण व्यवस्था मोडीत काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या विरोधात देशपातळीवर आंदोलन उभा करण्याची गरज गौड यांनी प्रतिपादन केली. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, व्ही. जी. पवार, सरचिटणीस राजकुमार कदम यांचीही भाषणे झाली. सुर्यकांत विश्वासराव यांनी अध्यक्षीय समारोप केला. सुत्रसंचालन जिल्हा सचिव गणेश आजबे यांनी केले तर कालिदास धपाटे यांनी आभार मानले.

# फरार आरोपीस माजलगाव पोलीसांनी ठोकल्या बेड्या

## एकवीस वर्षांपूर्वी चोरल्या होत्या ५५ मेंढ्या

**माजलगाव । प्रतिनिधी**

**२१ वर्षांपूर्वी गुंजडी येथून ५५ शेळ्या चोरून नेणारा आरोपी आप्पा महिपती पवार आपली ओळख लपवून पालम येथे राहत होता. २१ वर्षानंतर पोलिसांनी त्याची ओळख पटवून त्याला ताब्यात घेतले असून त्याची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे.**

फिर्यादी सटवा बापुराव नेमाने हा गुंज,ता.पाथरी, जिल्हा परभणी येथील रहिवासी आहे. त्याच्याकडे ६१ मेंढ्या आणि १२ शेळ्या होत्या. दि ७ एप्रील २००४ रोजी संध्याकाळी ७.०० ते ८.०० वाजेच्या सुमारास त्याने गुंजथडी गावातील दत्तात्रय तांगडे यांच्या शेतात मेंढ्या आणि शेळ्या बांधल्या.त्यावेळी लक्ष्मण रामभाऊ राहुभूत,त्याचे दोन मुलगे नामदेव आणि विष्णु, शेताचे मालक दत्तात्रय मुंजाभाऊ तांगडे आणि नारायण गणपत तांगडे त्याच्यासोबत होते.माहिती देणारा आणि लक्ष्मण वगळता ते सर्व झोपले होते.दि ८ एप्रिल २००४ रोजी मध्यरात्री १२.००



ते १.०० वाजेच्या सुमारास,गुंजथडी गावातुन चार अज्ञात चोरट्यांनी फिर्यादी यांचे ५५ मेंढ्या आणि १,००० रुपये अशी एकूण ३३,००० रुपये चोरुन घेवुन गेले आहेत वगैरे मजकुराचे फिर्यादीवरुन पोलिस ठाण्यात दिनांक ८ एप्रिल २००४ रोजी दुपारी २.०० वाजता त्याने ४ अज्ञात चोरांविरुद्ध तक्रार दाखल केली.सदर तक्रारीच्या आधारे आरोपी आणि इतरांविरुद्ध भारतीय दंड कलम ३९५,३४२ आर.डब्ल्यू.१४९ अंतर्गत गुन्हा क्रमांक ८४/२००४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास सुरू करण्यात आला. साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि घटनास्थळी पंचनामा तयार केला. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध जे.एम.एफ.सी, माजलगाव यांच्यासमोर आरोपपत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर यातील आरोपी नामे आप्पा महीपती पवार वय-४० वर्ष व्यवसाय रिक्षा चालक रा.कोटाळा ता.सोनपेठ जि. परभणी स्वताची ओळख लपवुन मागील २१ वर्षा पासुन फरार होता.दिनांक २१ जुलै २०२५ रोजी गोपनिय बातमीदार मार्फत माहीती मिळाली की,गुन्हा क्र.८४/२००४ कलम ३९५,३४२ भा.द. वी. आर.डब्ल्यू.१४९ मधील पाहीजे फरारी आरोपी नामे बन्शी महीपती पवार वय- ४० वर्ष व्यवसाय मजुरी रा. कोटाळा ता. सोनपेठ जि. परभणी हा पालम ता.पालम येथे आहे. त्यावरुन त्यास पालम येथुन तांत्रीक विष्लेशनाद्वारे शोध घेवुन त्यास ताब्यात घेतले व पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे आणले. त्याच्या अटकेची प्रक्रीया करुन गुन्ह्या संदर्भाने तपास केला असता त्याने काहि एक सहकार्य केले नाही व त्यास न्यायालयात हजर केले न्यायालयाने न्यायालयीन कोठडी मंजुर केल्याने त्यास जिल्हा कारागृह बीड येथे दाखल केले.

सदरची कारवाई नवनित कॉवत, पोलीस अधीक्षक बीड,श्रीमती चेतना तिडके,अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई,निरज राजगुरु उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांचे मार्गदर्शनाखाली राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक माजलगाव शहर, पोउपनि / के. बी. माकणे, पोह/ १४६० शेख, पोशि/१९२६ चव्हाण, पोशि/२२२२ गवळी, पोशि/२०८ पोकळे यांनी केली आहे.

# बीड तालुका भाजपाच्या वतीने बालाघाटावर रक्तदान शिबिर

## भाजप पदाधिकाऱ्यांनी सहभागी व्हावे -अशोक रसाळ

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण पशुसंवर्धन वातावरण बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून दिनांक २२ रोजी बीड जिल्हा भारतीय जनता पार्टी कार्यालय चाणक्यपुरी नाट्यगृह रोड येथे सकाळी १० ते ०४ वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे या रक्तदान शिबिरात बालाघाट मंडळातील मोठ्या



प्रमाणात नागरिक व पदाधिकारी यांनी सहभागी होऊन रक्तदान करावे गरजू गरीब व्यक्तींना या रक्तदानाचा जास्तीत जास्त फायदा होईल याकरिता असे आवाहन बालाघाट भाजप मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ यांनी केले आहे.

# तलवाडा पोलिसांची वाळूच्या ट्रॉलीसह ट्रॅक्टर वर कारवाई

तलवाडा प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत रुजू झाल्यापासून बीड जिल्ह्यात अवैध धंदेवाल्यांच्या विरोधात मोठ मोठ्या कारवाई करण्यात येत आहे. मोका सुद्धा लावण्याचे इशारा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिलेला आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय येथे वाळू माफियांना बोलून त्यांची परेड सुद्धा घेतली होती तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील बोरगांवथडी येथे वाळु

चोरटी वाहतूक विनापरवाना विना रॉयल्टी अवैधरीत्या वाळू वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर, यांना मिळाली असता तलवाडा पोलिसांनी सापळा रचून दिं.२१/रोजी सकाळी दहा वाजताच्या सुमारास बोरगाव थंडी ते भोगलगाव रोड वर वाळुचे ट्रॅक्टर वाहातूक करतांना एक ट्रॅक्टर पकडले हि कारवाई सपोनि मनोज निलंगेकर यांच्या



मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कैलास अन्नादास, गोपीनाथ शाखेचे विठ्ठल राठोड, पोलीस कॉन्स्टेबल अमोल ओसरमल, यांनी केली आहे. तलवाडा पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर ट्रॉली ताब्यात घेण्यात आली आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे, एकुण मुद्दे माल सहा लाख ५५००० हजाराचा जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार नारायण काकडे हे करीत आहेत

# परळीच्या प्रभारी गटशिक्षण अधिकारीपदी नांदुरकर

परळी । प्रतिनिधी

परळी पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी श्रीराम कनाके यांच्याविषयी शिक्षक आणि संघटनेमध्ये असंतोष असल्याने त्यांच्या विषयी अनेक तक्रारी होत्या. जिल्हा परिषद प्रशासनाने या तक्रारीची दाखल घेऊन सोमवार दिनांक २१ जुलै २०२५ रोजी परळीच्या प्रभारी गट शिक्षणाधिकारी पदावर बी. के. नांदुरकर यांची नियुक्ती केली आहे.



यासंदर्भात शिक्षक संघटनेच्या पदाधिकाऱ्याने म्हटले आहे की, श्रीराम कनाके यांनी पुढाऱ्यांची हुजरेगिरी करून प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून अतिरिक्त पदभार मिळविला आहे.

माजलगाव पंचायत समितीला शिक्षण विस्तार अधिकारी असतांना कामचुकारपणा आणि वरिष्ठांच्या आदेशाचे पालन केले नाही, म्हणून कनाकेला निलंबित करण्यात आले होते. माजलगाव येथून ◀◀ पान ३ वर

# संतोष थोरात यांची भाजपा सरचिटणीसपदी निवड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील खडकाचे भूमिपुत्र युवा कार्यकर्त्या संतोष थोरात यांची भारतीय जनता पार्टी, गेवराई पश्चिम मंडळ, सरचिटणीस पदी खडकी गावचे सुपुत्र व खडकी टाकळगव्हाण ग्रामपंचायत सदस्य श्री संतोष थोरात यांची निवड करण्यात आली. स्व.लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना दैवत मानून, व भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे व प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वात एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून काम करत आहेत. नुकत्याच झालेल्या भाजपा



मंडळ/ तालुका पदाधिकारी निवडी मध्ये संतोष थोरात यांना नामदार पंकजाताई मुंडे, मा.खा.प्रितमताई मुंडे, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या आदेशाने नियुक्ती देण्यात आली आहे. संतोष थोरात यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतुन भाजपचा प्रमाणिक कार्यरता म्हणून सतत पक्षात एकनिष्ठा राहुन काम केल्याने संतोष थोरात यांची गेवराई तालुका सरचिटणीस म्हणून निवड झाल्याने सर्वसामान्य कार्यरतास न्याय मिळाल्याची भुमिका स्पष्ट झाली आहे,

# नागरी समस्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ही खेदाची बाब -लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरालगत पोखरी रोड वर पावसाचे तसेच गटाराचे पाणी सातत्याने साचत आहे दररोज पंधरा ते वीस दुचाकी स्वार या रस्त्यावरून वाहतूक करत असताना घसरून पडत आहेत. जोगाईवाडी चे सरपंच पती बालासाहेब दोडतले समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहेत मात्र भाजपच्या ताब्यात असलेल्या आणि प्रामुख्याने आ मुंदडाचे होम पिच असलेल्या जोगाईवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या या भागात नागरिक सातत्याने ओरड करत आहेत मात्र या गंभीर प्रश्नाकडे आमदार



महोदयाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे तसेच प्रशासन या ठिकाणी फक्त पाहणी करते मात्र पुढील कारवाई अद्याप झाली नाही.

मागील काही वर्षापासून प्रशासक असल्याने एकमेव आमदार महोदय यांची पकड प्रशासकावर आहे केज मतदार संघात विकास कामाच्या नावावर एवढा निधी आणलेला असताना दुसरीकडे स्वतःच्याच होम पिचवर येथील नागरिक सातत्याने नाल्या बांधून रस्त्यावरील पाण्याचे व्यवस्थापन करन्याची मागणी करत असताना प्रशासनाचे व आमदार महोदयाचे या गंभीर समस्ये कडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष ही खेदाची बाब आहे या रस्त्यावर शाळा महाविद्यालय असल्याने तसेच हा रस्ता लातूरला जात असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक वर्दळ असते या गंभीर समस्येकडे आमदार महोदय व प्रशासनाने गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन पावसाचे तसेच नाल्याच्या पाण्याचे व्यवस्थापन करावे अन्यथा कॉंग्रेस पक्षाच्या वतीने या गंभीर जन समस्या सोडवण्यासाठी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अंबाजोगाई तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभिजीत लोमटे यांनी दिला आहे.

# पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नारायणगड येथे गणेश लांडे यांच्या वतीने वृक्षारोपण व रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या धाकट्या पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री क्षेत्र नारायणगड येथे ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये रक्तदान शिबिर व वृक्षारोपण यांचा समावेश होता. परिसरातील नागरिकांचा या उपक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे आयोजन गणेश लांडे यांच्या पुढाकाराने व प्रयत्नातून करण्यात आले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले श्री क्षेत्र नारायणगडचे मठाधिपती ह. भ. प. प्रेममूर्ती शिवाजी महाराज



यांची उपस्थिती. त्यांनी पवित्र गडभूमीतून ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा व आशीर्वाद दिले. यानंतर त्यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महाराजांनी कार्यक्रमातील सामाजिक उपक्रमांचे कौतुकही केले. या वेळी भाजपा बीड जिल्हाध्यक्ष शंकरभाऊ देशमुख यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे, भटक्या विमुक्त प्रदेश उपाध्यक्ष भाग्यश्रीताई ढाकणे, बीड ग्रामीण मंडळ अध्यक्ष मनोज काका पाटील, बीड ग्रामीण मंडळ उपाध्यक्ष विठ्ठल शिंदे, भागवत दुबाले, सरचिटणीस नरेश पवार, प्रिताताई कुकडेजा, राजू शहाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. रक्तदान शिबिरात तरुणांपासून महिलांपर्यंत अनेकांनी सहभाग घेतला. वृक्षारोपण उपक्रमात गड परिसरात विविध प्रकारची केसरी आंबा, नारळ व अन्य उपयुक्त झाडांची लागवड करण्यात आली. पर्यावरण रक्षणाच्या दृष्टिकोनातून राबवलेल्या या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे. याशिवाय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून शिक्षणाची गोडी वाढवण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्लास्टिकमुक्तीसाठी कापडी पिशव्यांचे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. ◀◀ पान ३ वर

# माजलगाव शहर भाजपाच्या वतीने आज रक्तदान शिबिराचे आयोजन -रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस व दि २६ जुलै रोजी भाजपाच्या नेत्या नामदार पंकजा मुंडे यांचा वाढदिवस आहे ,या वाढदिवसानिमित्त कुठलीही बॅनरबाजी न करता सामाजिक उपक्रम राबवत हा वाढदिवस करावा असे आवाहन करण्यात आले आहे,आपण समाजाचं देणं लागतो व सामाजिक बांधिलकी जपणे हे आपले कर्तव्य आहे व याचाच एक भाग म्हणून आज दि २२ जुलै मंगळवार रोजी सकाळी ०९:३० वाजता गणपती मंदिर जुना मोंढा माजलगाव येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजित



करण्यात आले.तरी आपण सर्व नागरिकांनी या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी होऊन रक्तदान करावे असे आवाहन माजलगाव भाजपा शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.भारतीय जनता पार्टीच्या दोन्ही नेत्यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे माजलगाव शहर भाजपा पार्टीने ठरवले आहे. रक्तदान हे जीवनदान व श्रेष्ठ दान आहे.रक्तदान केल्यामुळे अनेक फायदे देखील आपल्या शरीरास होतात त्यामुळे रक्तदान हे एक महत्त्वाचे कार्य आहे ज्याद्वारे आपण गरजूंना जीवदान देऊ शकतो त्यामुळे त्यामुळे केवळ रुग्णांनाच नव्हे तर रक्तदात्यालाही अनेक आरोग्य विषयक फायदे मिळतात,नियमित रक्तदान केल्याने शरीरातील लोहाचे प्रमाण नियंत्रित राहते त्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो रक्तदान केल्याने शरीरातील नवीन रक्तपेशी देखील तयार होतात त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती ◀◀ पान ३ वर

# सभागृहात रम्मी खेळणाऱ्या कृषी मंत्र्यांनी राजीनामा द्यावा -कुरे

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेच्या सभागृहात मोबाईल वरील रम्मी गेम खेळणाऱ्या कृषिमंत्र्यांनी स्वतःहून आपल्या मंत्रीपदाचा त्वरित राजीनामा द्यावा अशी मागणी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव शिवाजी कुरे यांनी केली आहे



महाराष्ट्रातील शेतकरी अगोदरच वेगवेगळ्या संकटात सापडला असून प्रचंड आर्थिक अडचणीत आहे. एकीकडून आसमानी संकट त्याचबरोबर सरकार जे शेतकरी विरोधी धोरणे राबवत आहे त्या धोरणांचाही मोठा परिणाम त्यांच्या जीवनावर होत आहे.त्यामुळे महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत बऱ्याच जणांच्या मुलींचे पैसे अभावी लग्न करणे सुद्धा मुश्किल झालेले आहे.शेतकरी प्रचंड कर्जबाजारी झालेला आहे.या परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी राहण्याच्या ऐवजी त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले जात आहे सरकारमधील कृषी खाते हे जिम्मेदारीचे खाते असतानाही याबद्दल कृषीमंत्र्यांना काहीच वाटत नाही. ◀◀ पान ३ वर

# फसवणूक प्रकरणातील फरार आरोपीला अटक

बीड/प्रतिनिधी

इलेक्ट्रॉनिक वस्तू घेऊन फरार झालेला रवींद्र बादल या आरोपीला शिरूर पोलिसांनी पुणे येथील मोरेवाडी परिसरात अटक केली त्याच्याकडून जवळपास ५० हजाराचा माल जप्त केला. ही कारवाई शिरूर पोलिसांनी केली.

शिरूर कासार पोलीस स्टेशनने गुन्हा क्रमांक १४८/२४, कलम ४०६, ४२० भा.दं.वि. अंतर्गत मागील एक वर्षापासून फरार असलेल्या आरोपी रवींद्र मनसुख बांदल, रा. कानोबाची वाडी, ता. शिरूर कासार, जि. बीड याला अटक केली आहे.

तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा शोध घेऊन त्यास पुणे जिल्ह्यातील पिंपरी




चिंचवड येथील मोरे वस्ती, श्रीराम कॉलनी येथून ताब्यात घेतले. १९ जुलै २०२५ रोजी त्याला अटक करण्यात आली.आरोपीकडून गुन्ह्यात फसवणूक करून नेलेला एकूण ४९,०८८/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, ज्यात १३,६००/- रुपये रोख रक्कम, जिओ कंपनीचा वायफाय सेटअप आणि इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू (किंमत ३५,४८८/- रुपये) यांचा समावेश आहे.सदर कारवाई नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हानपुडे पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण जाधव यांचे मार्गदर्शनाखाली अधिकारी पोलीस हवालदार १२४५ बाळासाहेब सुरवसे आणि पोलीस हवालदार ७४३ राहुल नांगरे यांनी केली आहे.

# जनसुरक्षा विधेयकाच्या विरोधात परळीत निदर्शने

परळी । प्रतिनिधी

भारतीय राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मुलभूत अधिकारावर गदा आणणारे महाराष्ट्र सरकारने पारित केलेले जन सुरक्षा विधेयक रद्द करण्याच्या मागणीसाठी परळीत जनसुरक्षा विधेयक विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक २१ जुलै रोजी परळीत भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच राज्यपालांनी या विधेयकावर स्वाक्षरी न करता ते रद्द करावे अशा आशयाचे निवेदन परळीचे तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांच्या मार्फत राज्यपालांना देण्यात आले.



**विधेयक रद्द करण्याची मागणी**

राज्य सरकारने नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारे जनसुरक्षा विधेयक पारित केले आहे. या कायद्याच्या विरोधात परळीत जनसुरक्षा कायदा विरोधी कृती समितीच्या वतीने सोमवार दिनांक २१ जुलै रोजी मोंढा मार्केट येथे दुपारी १२ वाजता भव्य निदर्शने करण्यात आली. तसेच यावेळी जनसुरक्षा विधेयक रद्द करावे, राज्य सरकारचा जाहीर निषेध, संविधान वाचवा देश वाचवा आदी घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. ◀◀ पान ३ वर

# लम्पीमुळे पहाडी पारगावात एका वासराचा मृत्यू

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगांवत एका वासराचा लम्पी त्वचा रोगामुळे मृत्यू झाला आहे तर अनेक जनावरे बाधित झाले आहेत त्यामुळे पशुपालकांमध्ये चिंतामयभीतीच वातावरण निर्माण झाले आहे या गावाला असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांचे मात्र दुर्लक्ष अद्यापही कायम आहे.

पशुपालक शेतकरी बाळकृष्ण अंडील यांच्या कारवड,गाय व तिचे दोन महिन्याचे वासरू यांना लम्पी त्वचा रोगाची लागण काही दिवसांपूर्वी झाली होती तेव्हा पशुपालकांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांना वारंवार कल्पना दिल्यानंतर त्यांनी पशूंची पाहणीकरून लसीकरण केले होते.अंबाजोगाई येथून पशुवैज्ञानिकांच तज्ञ पथक येऊन पशूंची तपासणी केली पण कारवड,गायीला व तिच्या



वासराला आलेल्या गाठी,ताप,चारा नखाने,पाणी नपिणे,पायामध्ये सूज, गाठी फुटल्यामुळे जनावरे विद्रूप झाली होती त्यांची तडपड पाहवेनासी झाल्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांनी डॉ.फुंदे यांना याची कल्पना दिलीतरी ते आले नाहीत म्हणून मागील दहा दिवसापासून खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर कडून पशूंची ट्रीटमेंट चालू होती त्यापैकी एका वासराचा गायीला पिता आले नाही म्हणून शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी लम्पी आजारामुळे तडपून तडपून मृत्यू झाला. दुपत्या गायीच्या वासराचा मृत्यू झाल्यामुळे माझे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले आहे लम्पी आजारामुळे मृत्यू झाल्याची नोंद डॉ.फुंदे यांनी घेऊन शासनाकडून अनुदान प्राप्त करून द्यायला हवे कारण आपल्या जिल्ह्याच्या पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री असल्यामुळे त्याचा फायदा आम्हाला होऊ शकतो अस मत पशुपालक शेतकरी बाळकृष्ण अंडील यांनी व्यक्त केले.

पहाडी पारगावचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांनी गावाला वारंवार भेट देऊन पशूंची तपासणी करून लम्पी आजार आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी पशुपालक शेतकरी करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email. rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# इंदापूरात संत तुकोबारायांच्या पालखी तळावर सुवर्ण पिंपळ, अजान वृक्षांचे रोपण

**इंदापूर । प्रतिनिधी**

माऊली हरित अभियान आणि बायोस्पिअर संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने इंदापूर येथील जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तळावर अजान वृक्ष, सुवर्ण पिंपळ आणि नांदृक वृक्षांचे रोपण करण्यात आले. श्री ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठ गमन सोहळ्याच्या निमित्ताने हा अनोखा उपक्रम राबवण्यात आला. यंदा प्रथमच पालखी सोहळा श्री क्षेत्र आळंदी येथे माऊलींच्या भेटीला येत असल्याच्या सुवर्ण योगावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात श्रीराम मंदिरातून रोपांची पालखी काढून झाली. यामध्ये मोठ्या संख्येने इंदापूरकरांनी उत्साहाने सहभाग घेतला. माऊली हरित अभियानाचे प्रमुख डॉ. सचिन पुणेकर यांनी सांगितले की, गेल्या चार वर्षांपासून





वृक्ष संगोपनामुळे पालखी तळावरील वृक्षांची संख्या वाढली असून, काही वृक्ष दहा फूट उंचीपर्यंत वाढले आहेत. यामुळे पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळाली आहे.

याप्रसंगी वृक्ष संजीवनी परिवाराच्या सायरा अत्तार आणि जय इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग कॉलेजच्या प्रमुख लता नायकुडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दत्तात्रय गायकवाड आणि शैलेंद्र पटेल यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला माजी नगराध्यक्षा अलका ताटे, माजी उपनगराध्यक्ष प्रा. कृष्णाजी ताटे, ड. आनंद केकान, ह.भ.प. ओंकार महाराज जौंजाळ, ह.भ.प. शेषांगर महाराज बोबडे, ह.भ.प. मीनिनाथ महाराज कुंभार, ह.भ.प. दिनेश महाराज गायकवाड, प्रा. जयश्री सरवदे, स्वाती अधटराव, लता नागपुरे, रोहिणी जौंजाळ, वर्षा गाढवे, मीना वेदपाठक, श्यामल घासकाटू, हमीदभाई अत्तार, प्रशांत सिताप, चंद्रकांत देवकर, संतोष जामदार, भारत बोराटे, अशोक ननवरे, सफल घासकाटू, रामेश्वर साठे, प्रशांत गिड्डे, रविंद्र परबत, शरद झोळ, डॉ. सुदिप ओहोळ, किसन पवार, देवराम मते, असलम शेख, ज्ञानदेव शिंदे, सुहास जौंजाळ आदी उपस्थित होते.

आळंदी-पंढरपूर दर्शनाची अनुभूती इंदापूरात प्रा. कृष्णाजी ताटे यांनी सांगितले की, इंदापूरातील वृक्ष लागवडीमुळे शहर पर्यावरणपूरक बनत आहे. सुवर्ण पिंपळ, अजान वृक्ष आणि नांदृक वृक्षांमुळे आळंदीतील ज्ञानेश्वर माऊली आणि देहूतील संत तुकाराम महाराज यांचा आशीर्वाद इंदापूरात अवतरला आहे. भविष्यात या वृक्षांना प्रदक्षिणा घालताना इंदापूरकरांना देहू, आळंदी आणि पंढरपूर येथील दर्शनाचा अनुभव मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# गारगोटी हायस्कूलमध्ये राख्या निर्मिती कार्यशाळा संपन्न : विद्यार्थ्यांनी बनवल्या पाच हजार राख्या



**पुणे । प्रतिनिधी**

गारगोटी हायस्कूल व श्री. समर्थ कनिष्ठ महाविद्यालयात राख्या निर्मिती कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी विद्यार्थी विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पाच हजार राख्या तयार केल्या. या राख्या भारताच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांना पाठविण्यात येणार आहेत. प्रारंभी या उपक्रमाच्या प्रमुख श्रीमती आर. आर. बहादुरे यांनी राखी बनविणे या उपक्रमाचे सामाजिक आणि वैयक्तिक फायदे सांगून यामाध्यमातून विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला मिळणारा वाव, स्वनिर्मितीचा आनंद, चिरकाल स्मरणात राहील अशी आठवण, आर्थिक फायदा, नवीन व्यवसाय संधी याबद्दल माहिती दिली.

यावेळी विद्यार्थ्यांनी आणलेल्या साहित्याच्या आधारे वेगवेगळ्या आकाराच्या सुंदर अशा राख्या तयार केल्या. राख्या तयार करताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणित झाला होता.

या उपक्रमासाठी प्राचार्य मिलिंद पांगिरेकर यांचे प्रोत्साहन तर श्री.धीरज मेंगाणे व उत्कर्ष गव्हाणकर यांचे सहकार्य लाभले.

# पत्नीने दुसरा विवाह करुन फसवणूक केल्याने तरुणाची आत्महत्या

**पुणे । प्रतिनिधी**

पत्नीने दुसरा विवाह करुन फसवणूक केल्याने एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वडगाव शेरी परिसरात घडली. याप्रकरणी चंदननगर पोलिसांनी पत्नीसह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सिडनी लॉरेन्स दोरायराज ( ३९, रा. शिलानंद हाऊसिंग सोसायटी, वडगाव शेरी) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी सिडनी यांचा मोठा भाऊ स्टॅन्ली लॉरेन्स दोरायराज ( ४१) यांनी फिर्याद दिली आहे.



त्यानूसार स्वाती सिडनी दोरायराज (३२), चेतन मोरे ( ३५, रा. बडोदा, गुजरात) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वाती आणि सिडनी यांचा २०१४ मध्ये विवाह झाला होता. त्यानंतर स्वातीचे चेतन मोरे याच्याशी प्रेमसंबंध जुळले. कायदेशीर घटस्फोट न घेता. ती आरोपी चेतन मोरे याच्यासोबत राहू लागली. 'दुसरा विवाह केल्यानंतर मी खूश नाही. मला तुझ्यासोबत राहायचे नाही. मी परत येणार आहे', असे तिने पती सिडनी याला सांगितले. त्यानंतर स्वातीने तिचा दुसरा पती चेतन याच्याशी संगमनत करुन सिडनीकडून वेळोवेळी १५ लाख १८ हजार रुपये घेतले. परत नांदायला येते असे आमिष दाखविले.त्यानंतर स्वाती नांदायला न आल्याने सिडनीने तिच्याकडे विचारणा केली. त्याने तिच्याकडे पैसे परत मागितले. तेव्हा 'मी बलात्कार आणि छळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करेल. तू आणखी पैसे पाठव', अशी धमकी स्वातीने त्याला दिली. पत्नीचा छळ आणि तिच्या धमकीमुळे सिडनीने राहत्या घरात गळफास घेऊन नुकतीच आत्महत्या केली, असे स्टॅन्ली दोरायराज यांनी फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक पाटील तपास करत आहेत.

# चोरट्यांनी विद्युत रोहित्र फोडले; 33 हजारांचा ताब्याचा ऐवज चोरीला



**नसरापूर । प्रतिनिधी**


भोर तालुक्यातील पारवडी गावात खंडोबा मंदिराजवळ अज्ञात चोरट्यांनी वीज रोहित्र फोडून ३३ हजार रुपयांचा तांब्याचा ऐवज चोरी केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी कैलास गोविंद भोये (वय ३३, रा. नसरापूर) यांनी राजगड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, ही घटना १९ जुलै रात्री ८ ते २० जुलै सकाळी १०.३० दरम्यान घडली. पारवडी ते सांगवी फाटा रस्त्यालगत असलेल्या खंडोबा मंदिराजवळील ६३ के.व्ही.ए. क्षमतेच्या रोहित्र क्रमांक ४०५८९६६ वर चोरट्यांनी डल्ला मारला. त्यांनी रोहित्र खाली पाडून त्यातील ऑईल सांडवले आणि अंदाजे ५५ किलो वजनाच्या तांब्याच्या तारा चोरून नेल्या. यामुळे वीज वितरण कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या प्रकरणी राजगड पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय वीज अधिनियम कलम १३६ आणि भादंवि कलम ३२४(४) अन्वये गुन्हा (गु.र.नं. २८२/२०२५) दाखल केला आहे. गुन्ह्याची नोंद २१ जुलै रोजी दुपारी १२.३८ वाजता झाली. पोलीस नाईक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि संशयास्पद हालचालींची माहिती तत्काळ कळवण्याचे आवाहन केले आहे.

# मनसे मध्ये ५००घ फॉलोअर्स होते, शिवसेनेत गेल्यावर ६०५K झाले; वसंत मोरेंचे विधान

**पुणे । प्रतिनिधी**

मनसे पक्षाला रामराम ठोकल्यानंतर वसंत मोरे यांनी वंचित बहुजन आघाडीच्या तिकीटावर लोकसभा निवडणूक लढविली. मात्र यात त्यांचा पराभव झाला. यानंतर त्यांनी काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरेंची भेट घेतली. यानंतर दि. ९ जुलै २०२४ रोजी वसंत मोरे यांनी जाहीररित्या उद्धव ठाकरे गटात प्रवेश केला.

वसंत मोरे सोशल मीडियावर चांगलेच सक्रिय असतात. मराठी माणसाच्या हक्काचा विषय असो वा एखाद्याला मदत करणं असो मोरे आपली प्रत्येक अपडेट सोशल मीडियावरून देत असतात. सोशल मीडियावर देखील त्यांचा मोठा चाहता वर्ग असून, त्यांची प्रत्येक पोस्ट नेहमीच ते चर्चेत असते. त्यांचे चाहते आणि कार्यकर्ते त्यांच्या सर्वच पोस्टला भरभरून प्रेम देतात. दरम्यान, अश्यातच वसंत मोरे यांच्या एका व्यक्तव्याने



चांगलंच लक्ष वेधून घेतलं आहे. नुकतंच त्यांनी एका प्रसिद्ध वृत्तसंस्थेला मुलाखत दिली असून, यावेळी त्यांनी अनेक खुलासे केले आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या मिम्सवर देखील त्यांनी परखड भाष्य केलं आहे.

मी तर असं बोलतो की, शिवसेनेत आल्यावर माझे सोशल मीडियावर फॉलोअर्स वाढले. मी जेव्हा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेत होतो तेव्हा माझ्या पेजवर ५००घ फॉलोअर्स होते, आणि ठाकरे गटात प्रवेश केल्यानंतर माझे ६०५घ फॉलोअर्स झाले आहेत. असं त्यांनी सांगितलं. ठाकरे बंधुंच्या युतीसंदर्भात बोलताना वसंत मोरे म्हणाले की, गेले चार-पाच दिवस अगोदर सुरुवातीला जेव्हा या घटना चालू होत्या तेव्हा मी म्हणालो होतो या सर्व प्रकरणात मला सर्वाधिक आनंद होईल. आणि सुरुवातीला मी शिवसेना आणि नंतर मनसे आणि आता पुन्हा शिवसेना. त्यामुळे मला खूप आनंद झाला आहे. मी या दोन्ही नेत्यानं सोबत काम केलं आहे. असं देखील वसंत मोरे यावेळी म्हणाले.

# मर्सिडीज कारच्या अपघातानंतर ६ जणांवर हल्ला, चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-नगर रस्त्यावर मर्सिडीज कारला पाठीमागून धडक देत झालेल्या अपघातानंतर संतप्त झालेल्या स्विफ्ट कारमधील चौघांनी गाडीचा चालक, गाडी मालक, त्यांच्या कुटुंबीय व नातेवाईकांवर हल्ला करून शिवीगाळ करत मारहाण केली. याप्रकरणी वाघोली पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विनोद सदाशिव कानडे (वय ३२, रा. वाघेश्वर नगर, वाघोली) हे गेली तीन वर्षे अरविंद व्यंकटेश कोथापल्ली यांच्याकडे मर्सिडीज गाडीचे चालक म्हणून काम करत आहेत. दि. २० जुलै रोजी दुपारी १२.३० वाजता आय स्कॉश अकॅडमी, मुंढवा येथून मालकाचा मुलगा अरव कोथापल्ली याला घरी नेत असताना, एचडीएफसी बँकेजवळ मर्सिडीज गाडीला काळ्या रंगाच्या स्विफ्ट कारने पाठीमागून जोरात धडक दिली.

अपघातानंतर गाडीचे मागील बंपर आणि दरवाज्याचे काच फुटल्याचे निदर्शनास आले.




त्यानंतर स्विफ्ट कारमधून आदेश बाळासाहेब लोहोट (वय ३२), भरत हरी पौळ (वय १९), वैष्णवी रेश्मा मुसळे (वय २२) आणि आरती शिंदे (वय २३) या चौघांनी उतरून चालक विनोद कानडे यांना मारहाण केली. तसेच गाडीचे नुकसान भरून दे किंवा पोलिसांत तक्रार केलीस तर जीव मारू अशी धमकीही दिली.

काही वेळात गाडी मालक अरविंद कोथापल्ली व त्यांची पत्नी वर्षा कोथापल्ली घटनास्थळी आले असता, त्यांच्या समक्षही चौघांनी मारहाण व शिवीगाळ करत, महिला सदस्यावरही हात उचलण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर ते साई सर्व्हिस सेंटरकडे घेऊन गेले आणि तिथेही शिवीगाळ चालूच होती. या दरम्यान, अरविंद कोथापल्ली यांचे नातेवाईक विशाल वर्मा आणि अनुराग वर्मा यांनाही मारहाण करण्यात आली. या प्रकरणी वाघोली पोलिसांनी चौघांविरुद्ध गंभीर मारहाणीचा गुन्हा नोंदवून अधिक तपास सुरू केला आहे.

# घरात घुसून तरुणाचा गळा चिरुन खून; पर्वती दर्शन येथील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती दर्शन येथे सोमवारी सकाळी साडेनऊच्या सुमारास एका तरुणाचा घरात घुसून चाकूने गळा कापून खून करण्यात आला. याप्रकरणी पर्वती पोलिसांनी तासाभरातच आरोपीला सातारा रस्त्यावरील भापकर पेट्रोल पंपाजवळून ताब्यात घेतले आहे. दानिश सिद्दीकी( २५, रा.पर्वती दर्शन) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी दिनेश प्रभाकर क्षिरसागर(३५, रा.यवतमाळ) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, दानिश हा सहा महिण्यापुर्वीच भावाकडे रहायला आला होता. तो दररोज स्वारगेट परिसरात कच्छी दाबेलीची गाडी लावत होता. तर आरोपी दिनेश हा मुळचा यवतमाळचा असून तो फिरस्ता आहे. स्वारगेट परिसरात तो पदपथावर रहातो. तो आज(सोमवारी) सकाळी साडेनऊच्या सुमारास दानिश याच्या घरी आला. तेव्हा दानिश आवरा आवरी करत होता.

अचानक घरात घुसून त्याने चाकूने दानिशच्या गळा आणि पाठिवर सपासप




वार केले. दानिशच्या आवाजाने त्याच्या खोलीच्या वर रहाणारा त्याचा भाउ , वहिणी आणि रहिवाशी धावत आले. तोवर दिनेशने चाकूसह पळ काढला होता. नागरिकांनी त्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो हाती लागला नाही. दरम्यान दानिशला जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले.तेथे प्रचंड रक्तस्त्राव झाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

पोलिसांनी दिनेशचा माग काढला असता, तो सातारा रस्त्यावरील पुमा शोरुमच्या मागे लपून बसला होता. पोलीस त्याला पकडायला जात असताना त्याने पोलिसांच्या दिशेने दगडफेक करण्याचा प्रयत्न केला.

त्याला ताब्यात घेतल्यावर, त्याच्या अंगावर रक्ताचे डाग होते. त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने कोणतेही कारण सांगितले नाही. तसेच दागिनच्या घरच्यांनाही या दोघांमध्ये वाद कोणत्या कारणाने झाला हे माहित नाही. याप्रकरणाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

# पुण्यातील भाटघर धरणाचं पाणी अचानक झालं हिरवं! स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण

**भोर । प्रतिनिधी**

भोर तालुक्यातील भाटघर(येसाजी कंक जलाशय) धरणाच्या परिसरातील पाण्याला अचानक हिरवा रंग चढल्यामुळे तसेच बॅक वॉटर क्षेत्रातील संगमनेर, माळवाडी व नऱ्हे गावांच्या लगतच्या जलसाठ्यात हा बदल स्पष्टपणे दिसून येत असल्याने स्थानिक नागरिक आणि शेतकरी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असुन संबंधित प्रकारामुळे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेवर, शेतीसाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या परिणामकारकतेवर आणि नागरिकांच्या आरोग्यावर संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो अशी चिंता स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

याबाबत स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीवरून काल रविवार (दि.२०) रोजी पाण्याला अचानक हिरवा रंग चढत असल्याचे निदर्शनास आले परंतु सोमवार (दि.२१) रोजी मात्र बॅक वॉटर क्षेत्रातील संगमनेर,



माळवाडी व नऱ्हे गावांच्या लगतच्या जलसाठ्यात हा बदल स्पष्टपणे दिसून आल्याने स्थानिक नागरिकात भीतीचे वातावरण निर्माण झाले. परिणामी धरणाच्या पाण्यातील हा रंग बदल जैविक की रासायनिक प्रक्रिया आहे, याबाबत वैज्ञानिक आणि निष्पक्ष स्पष्टीकरण मिळावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. प्रशासनाने तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने यावर कार्यवाही करावी, अशी आग्रही भूमिका स्थानिक नागरिकांनी घेतली आहे.

घटनेची गंभीर दखल घेत उपविभागीय अधिकारी डॉ. विकास खरात यांनी जलाशयातील पाण्याच्या गुणवत्तेबाबत स्थानिकांनी व्यक्त केलेल्या शंकेनंतर त्वरित नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच पाण्यातील तवंग हटवण्यासाठी आवश्यक उपाययोजना तत्काळ राबवण्याच्या सूचनाही संबंधित विभागास दिल्या आहेत.

# बापानेच केला पोटच्या लेकराचा खून, फुरसुंगी परिसरातील घटना

**पुणे । प्रतिनिधी**

फुरसुंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या वडकी येथील वलवा वस्ती परिसरात कौटुंबिक वादातून एका ३५ वर्षीय तरुणाचा वडिलांकडून खून झाल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात वडिलांवर भारतीय न्याय संहिते अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

मनोहर ताबाजी डोके (३६ ) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या मेव्हण्याचा खून झाल्याप्रकरणी त्यांनी सासऱ्याविरुध्द तक्रार दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास कैलास नगर, वलवा वस्ती येथील राहत्या घरी त्यांचे सासरे सुरेश बाबुराव जमदाडे (५९) यांनी मुलगा प्रशांत सुरेश जमदाडे (३५) यास शिवीगाळ करत गंभीर मारहाण केली.

या वादात प्रशांतला जमिनीवर पाडून गमजाच्या सहाय्याने गळा दाबून आणि डोकं जमिनीवर आपटून ठार मारले. घटनेची माहिती मिळताच उपायुक्त सोमय मुंडे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ निरीक्षक अमोल मोरे, पोलीस निरीक्षक संजय पतंगे दाखल झाले होते. त्यांनी आरोपीस ताब्यात घेतले. या घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नानासाहेब जाधव हे करत आहेत. आरोपी आणि मृत हे दोघेही मजुरी काम करतात. आरोपीच्या पत्नीला अर्धांगवायूचा झटका आल्याने मागील दोन वर्षे त्या घरीच आहे. मृत प्रशांत नेहमी मद्यपान करुन घरच्यांना त्रास देत होता. यामुळे घरात नेहमीच वाद होत होते. रविवारी रात्रीही वाद झाल्यावर रागाच्या भरात वडिलांनी मुलाचा खून केला.

# पोलिसांना गुंगारा देणाऱ्या आरोपीस ठोकल्या बेड्या: दोन वर्षांपासून होता फरार

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाईनंतर फरार झालेल्या गुंडाला आंबेगाव पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर परिसरातून अटक केली. गेले दोन वर्ष गुंड पोलिसांना गुंगारा देत होता.

नवाज निसार सय्यद (वय २३, रा. संतोषनगर, कात्रज, मूळ रा. मुसा चौक, छत्रपती संभाजीनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. सय्यद याच्यासह साथीदारांविरुद्ध पोलिसांनी २०२३ मध्ये 'मकोका' कारवाई केली होती.

पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर सय्यद पसार




झाला होता. सय्यद छत्रपती संभाजीनगरमध्ये असल्याची माहिती आंबेगाव पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी चेतन गोरे, हनुमंत मासाळ यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने सापळा लावून सय्यद याला अटक करण्यात आली.

पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक शरद झिने, गुन्हे शाखेचे निरीक्षक गजानन चोरमले, शैलेंद्र साठे, चेतन गोरे, हनुमंत मासाळ, निलेश जमदाडे, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, प्रमोद भोसले, नितीन कातुर्डे यांनी ही कामगिरी केली.